सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १६० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १९ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## महाराष्ट्र, केंद्र सरकारला सुप्रीम कोर्टाचे खडे बोल..

## विशेष न्यायालय स्थापना प्रस्तावासाठी शेवटची संधी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ नवी दिल्ली :**

केवळ विद्यमान न्यायालयांना विशेष न्यायालये म्हणून घोषित करून भागणार नाही, तर विशेष प्रकरणांसाठी नवी न्यायालये स्थापन करावी लागतील, असे सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी महाराष्ट्र सरकार व केंद्र सरकारला सुनावले. जर अतिरिक्त न्यायालये सुरू केली नाहीत, तर विशेष कायद्यांतर्गत अटक केलेल्या आरोपींवरील खटले रेंगाळून त्यांना जामीन देण्याशिवाय पर्याय राहणार नाही, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

न्या. सूर्यकांत आणि न्या. जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने सरकारची बाजू मांडणारे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल राजकुमार ठाकरे यांना विचारले की, आधीपासून अस्तित्वात असलेल्या न्यायालयांना विशेष न्यायालये म्हणून जाहीर करण्यात आले, तर अनेक खटले प्रलंबित राहतील. पायाभूत सुविधा, नवीन न्यायाधीश, कर्मचारी नेमणे, त्यासाठी सरकारने आवश्यक पदांना मंजुरी द्यावी.



न्यायालयाने सांगितले की, विशेष न्यायालयांच्या स्थापनेकरिता ठोस प्रस्ताव तयार करण्यासाठी शेवटची संधी केंद्र व महाराष्ट्र सरकारला देण्यात येत आहे. यासंदर्भातील न्यायालयाच्या आदेशावर दोन्ही सरकारांनी चार आठवड्यांच्या आत उत्तर द्यायचे आहे.

२३ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने एनआयए खटल्यांसाठी स्वतंत्र न्यायालयांची आवश्यकता अधोरेखित केली होती. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, एनआयए तपास करत असलेली प्रकरणे अत्यंत गंभीर स्वरूपाची असतात.

त्यातील घटनांचा देशभरात परिणाम जाणवतो. या खटल्यांत शेकडो साक्षीदार असतात. मात्र, न्यायमूर्ती इतर खटल्यांमध्ये व्यग्र असल्याने या खटल्यांच्या खटल्यांचे कामकाज धिम्या गतीने होते. त्यामुळे अशा प्रकरणांच्या दैनंदिन सुनावणीसाठी विशेष न्यायालये स्थापन करणे आवश्यक आहे.

नक्षलवाद्यांबद्दल सहानुभूती बाळगणारा कैलाश रामचंदानी याच्या जामीन अर्जावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू होती. २०१९ मध्ये आयईडी स्फोटात १५ पोलिस शहीद झाले होते. त्यानंतर रामचंदानीवर कायदेशीर कारवाई करण्यात आली.

## मी राज ठाकरेंना हिंदी शिकवली का?

### 'समुद्रात बुडवून बुडवून मारू', राज ठाकरेंच्या टीकेला, खासदार दुबेंनी दिले प्रत्युत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९मुंबई**

मागील काही दिवसांपासून हिंदी सक्तीवरुन राज्यात वाद सुरू आहे. काल मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मीरा-भाईंदर मध्ये जाहीर सभा घेतली. या सभेत ठाकरेंनी नगरसेवक, आमदार, खासदार आपलेच निवडून आणायचे. अमराठी मतदारसंघ बनवून हा सगळा भूभाग गुजरातला मिळवायचा हा यांचा डाव आहे. हिंदुत्वाच्या बुरख्याआडून मराठी संपवण्याचे राजकारण सुरू असल्याचे सांगितले. तसेच यावेळी त्यांनी भाजपा खासदार निशिकांत दुबे यांच्यावर जोरदार निशाणा साधला. दरम्यान, आता या टीकेला दुबे यांनीही प्रत्युत्तर दिले आहे.



काही दिवसांपासून राज ठाकरे आणि निशिकांत दुबे यांच्यामध्ये मराठी आणि हिंदी भाषेवरुन टीका सुरू आहेत. दुबे यांच्या 'पटक-पटकर मारेंगे' या विधानाला उत्तर देताना राज ठाकरे म्हणाले की ते 'डुबो डुबोकर' मारेंगे. आता निशिकांत दुबे यांनी राज ठाकरेंना हिंदी शिकवल्याचे सांगून प्रत्युत्तर दिले.

शुक्रवारी रात्री एका जाहीर सभेत राज ठाकरेंनी भाजप खासदार निशिकांत दुबे यांना प्रत्युत्तर दिले. त्यांना मुंबईत येण्याचे आव्हान दिले. निशिकांत दुबे यांच्या विधानाचा संदर्भ देत राज ठाकरे म्हणाले, 'भाजपच्या एका खासदाराने सांगितले की आम्ही येथे मराठी लोकांना मारहाण करू. दुबे, तू मुंबईत ये. आम्ही तुला मुंबईच्या समुद्रात बुडवून मारू.' राज ठाकरे यांनी हे शब्द हिंदीत सांगितले.आता यावर निशिकांत दुबे यांनी टीका केली. त्यांनी राज ठाकरेंचा व्हिडीओ इंस्टाग्रामवर शेअर केला आणि लिहिले की, 'मी राज ठाकरेंना हिंदी शिकवली का?, असा सवाल दुबेंनी केला आहे.

## शाळा बंद करण्यापेक्षा मदरसे बंद करून दाखवा

## मंत्री नितेश राणेंचं राज ठाकरेंना आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९मुंबई**

महाराष्ट्रात त्रिभाषा सूत्र लागू करणारच अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी मांडली. त्यावर मीरारोडच्या सभेत मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी समाचार घेतला. तुम्ही हिंदी सक्ती करून दाखवाच, आम्ही दुकाने काय शाळाही बंद करू असं राज यांनी म्हटलं. राज ठाकरे यांच्या या विधानावरून मंत्री नितेश राणे यांनी पलटवार केला आहे.



मंत्री नितेश राणे म्हणाले की, शाळा बंद करण्यापेक्षा मदरसे बंद करून दाखवा. तिथे दहशतवादी घडवण्याचं काम होते. बुलढाण्यात एका मदरशात यमनचे नागरिक सापडले. असंख्य मदरशांमध्ये जिलेटिन काड्या सापडतात, तलवारी सापडतात. मग हिंदू समाजात भांडणे लावण्यापेक्षा आमच्या शाळा बंद करण्यापेक्षा मदरसे बंद करून टाका असं आव्हान त्यांनी दिले.

तसेच हिंदी सक्तीचा निर्णय कुणी घेतला, जीआर कुणी मागे घेतला हे राज ठाकरेंनी समजून घेतले तर त्यातील व्हिलन कोण, शकुनी मामा कोण हे कळेल. मराठी मेळाव्यात ज्याच्यासोबत तुम्ही हातात हात घातला तोच खरा हिंदी सक्तीचा शकुनीमामा आहे. आज सामनामध्ये राज ठाकरेंच्या सभेची बातमी आहे का, माझा भाऊ सुरू आहे. बंधू प्रेम आहे मग आज बातमी का नाही..त्यामुळे खरा शकुनीमामा कोण तो मातोश्रीवर बसलेला आहे. हिंदी सक्तीविरोधात मोर्चे काढायचे असतील तर त्याला जबाबदार धरा असं सांगत नितेश राणे यांनी उद्धव ठाकरेंवरही निशाणा साधला.

दरम्यान, नया नगरमध्ये जे मराठीत बोलत नाही त्यांना मराठी बोलायला शिकवा, गरीब हिंदू समाजातील लोकांना मराठीवरून का मारता असा सवाल नितेश राणे यांनी केला. त्यावरून मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनीही जोरदार पलटवार केला. संजय भिसे, श्रीधर नाईक, रमेश गोवेकर हे हिंदू होते की नव्हते त्यावर नितेश राणेंनी उत्तर द्यावीत त्यानंतर आमच्यावर आरोप करावेत असं देशपांडे यांनी म्हटलं.

## रामटेक तालुक्यातील शाळेवर कोसळली वीज ; ७० विद्यार्थी बचावले

### सीसीटीव्ही, संगणक, पंखे आणि विजेची व्यवस्था निकामी; इमारतीला तडे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ नागपूर**

शाळेच्या आकाशात गडगडणाऱ्या मेघांनंतर अचानक वीज कोसळली आणि रामटेक तालुक्यातील वहांबा जिल्हा परिषद शाळेत क्षणभरात थरकाप उडवणारा क्षण घडला. शुक्रवारी (दि. १८) विज्ञान प्रयोगशाळेच्या स्लॅबवर वीज कोसल्याने शाळा हादरून गेली. ७० हून अधिक विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी थोडक्यात



बचावले, मात्र इमारतीला खोल तडे गेले आणि विद्युत उपकरणे भस्मसात झाली. मृत्यूने दारात थांबूनही मागे फिरल्याचा अनुभव शाळेने घेतला.

रामटेक तालुक्यातील देवलापार परिसरात दुपारी २.३० वाजताच्या सुमारास जोरदार वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. त्याचवेळी वांबा येथील जि.प. शाळेच्या विज्ञान प्रयोगशाळेला लागून असलेल्या कडुनिंबाच्या झाडावर व प्रयोग शाळेच्या वरच्या भागावर वीज कोसळली. याच प्रयोगशाळेला लागून इयत्ता सहावीचा वर्ग आहे. या वर्गात त्यावेळी १४ विद्यार्थी उपस्थित होते. विजेच्या प्रचंड कडकडाटामुळे विद्यार्थी घाबरले. संपूर्ण शाळेत भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेच्या वेळी शाळेत एकूण ७० विद्यार्थी आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विजेचा मोठा झटका बसल्याने शाळेतील सीसीटीव्ही कॅमेरे, संगणक, लॅपटॉप, ११ पंखे, ट्यूब लाइट्स, बल्ब्स आणि संपूर्ण विजेची अंतर्गत यंत्रणा पूर्णपणे निकामी झाली आहे.

## ...तर भाजपाच्या नेत्यांना विचारूनच राष्ट्रवादीचे विलिनीकरण - प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९मुंबई**

वरिष्ठ पातळीवर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची कसलीच चर्चा नसल्याने असे विलिनीकरण वगैरे कोसो दूर आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या विलिनीकरणाची कोणतीही चर्चा सुरू नाही. पण, असा काही निर्णय करायचा झाला तरी त्याबाबत भाजपाच्या शीर्षस्थ नेतृत्वाला विचारावे लागेल. भाजपाच्या नेत्यांनी आम्हाला विचारपूर्वक स्वीकारले आहे. त्यामुळे विलिनीकरणाचे काही निर्णय घ्यायचे झाल्यास त्याची कल्पनाही भाजपाच्या नेत्यांना द्यावी लागेल, असे स्पष्ट मत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी व्यक्त केले.



सुनील तटकरे पत्रकारांशी बोलत होते. गेल्या काही दिवसा राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील नेत्यांचा आमच्या बरोबरचा व्यवहार पूर्वीच्या आघाडीपेक्षा सौहार्दपूर्ण होता. १९९९च्या विधानसभेतमध्ये कॉंग्रेसबरोबर आम्ही अगदी थेट लढलो होतो. भाजपाचे नेतृत्त्व जेव्हा वाजपेयी यांच्या हाती होते, तेव्हाही राष्ट्रवादीला भाजपाबरोबर जाता आले असते. पण तसे केले नाही. आता मात्र अधिवेशनात ठराव घेऊन राष्ट्रीय लोकशाही आघाडीबरोबर राहण्याचा निर्णय घेतला आहे, असे सुनील तटकरे यांनी नमूद केले.

## ठाकरे ब्रँड बाजारात चालत नाही, जनतेला आवडत नाही; भाजपाचा ठाकरे बंधूंना खोचक टोला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९नागपूर**

ठाकरे ब्रँड जिवंत असला तरी तो बाजारात चालत नाही. बाजारात अनेक ब्रँड असतात, प्रत्येक ब्रँड बाजारात चालतो असे नाही. सध्या हा ब्रँड बाजारात जनतेस पसंत नाही. मतदारांना आवडत नाही अशा शब्दात भाजपा नेते सुधीर मुनगंटीवार यांनी ठाकरे बंधू राज आणि उद्धव यांच्यावर निशाणा साधला.



सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, उद्धव ठाकरे स्वत:ला सामान्य समजत असतील, कारण ते चिंताग्रस्त झालेत. बाकी सर्वसामान्य जनता जे मतदार आहेत ते आमच्यासोबत आहे. मतदानातून ईव्हीएम बटण दाबून त्यांनी त्यांचा पाठिंबा आम्हाला आहे हे सांगितले आहे. राजकारणाचा स्तर इतका खाली गेलाय की जादूटोणा वैगेरे भाषा केली जाते. जादूटोणा करून इतक्या जागा मिळाल्या असत्या तर आपल्या देशातील गरिबी हटवता आली असती, देशातला जातीयवाद हटवता आला असता. जादूटोणा जगात नाही. जादूटोणा असता तर आपल्याला गुलामगिरीत राहावे लागले नसते. ती कपोलकल्पित कथा आहे असं त्यांनी म्हटलं.

दरम्यान, महाराष्ट्रात मराठी सक्तीची आहेच. शिक्षण समितीचा अहवाल आल्यानंतर त्रिभाषा सूत्रीवर निर्णय होईल. राज ठाकरे यांनी काय भाषा वापरायची हा त्यांच्या पक्षाच्या संस्काराचा भाग आहे. जसे संस्कार तसे उच्चार असतात असा टोलाही सुधीर मुनगंटीवार यांनी राज ठाकरे यांना लगावला.

## बावनकुळे यांचा बच्चू कडू व वडेट्टीवारांवर हल्लाबोल

### कर्जमाफिसाठी समिती नेमली, बच्चू कडूंनी समजून घ्यावं

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

राज्याचे भाजपा नेते व मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आमदार बच्चू कडू यांच्यावर थेट निशाणा साधला. कर्जमाफीसंदर्भात बच्चू कडू यांनी समिती स्थापन करण्याची मागणी केली होती, ती आम्ही मान्य केली. मी स्वतः लेखी पत्र देऊन ती समिती स्थापन केली असून, काम देखील सुरू झालं आहे, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केलं.

अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे महसूल मंत्री आज अमरावती जिल्ह्या दौऱ्यावर होते यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. कर्ज माफी समितीत बच्चू कडूंनाही सहभागी करून घेण्यात येणार आहे.



कर्जमाफीवर जे कोण मते मांडू इच्छितात, त्यांना पूर्ण मुभा देण्यात येणार आहे. त्यामुळे बच्चू कडूंनी परिस्थिती समजून घ्यावी, अशी स्पष्टवक्ता विनंती त्यांनी केली.दिव्यांगांच्या मानधनात २,५०० रुपयांची वाढ सरकारने केली आहे. निर्णय होण्यासाठी काही वेळ लागतो. आज चर्चा झाली आणि लगेच निर्णय झाला, असं होत नाही. त्यामुळे बच्चू कडूंनी थोडा सरकारला वेळ द्यावा, असेही बावनकुळे म्हणाले.

**वडेट्टीवारांवर टीका : हनी ट्रॅप नव्हे, जनतेची दिशाभूल**

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यावरही बावनकुळे यांनी सडकून टीका केली. मुख्यमंत्र्यांनी काल स्पष्ट केलं की कोणताही हनी ट्रॅप नाही. हे केवळ जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करण्याचं काम आहे. विकासाचा अजेंडा नसल्याने विरोधकांकडून अशा प्रकारे राज्याला भरकटवण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोप त्यांनी केला.

वडेट्टीवारांनी विधायक बोलायला हवं. शेतकरी, शेतमजूर, जनतेचे खरे प्रश्न मांडायला हवेत. फनी ट्रॅप, हनी ट्रॅप असे विषय काढून सभागृहाचा व जनतेचा वेळ वाया घालवू नये, असेही ते म्हणाले.

विरोधक सध्या तीन भागात विभागले गेले आहेत. विविध पक्षांनी वेगवेगळ्या पत्रकार परिषद घेतल्या. अशा विभागलेल्या विरोधी पक्षाकडे स्पष्ट भूमिका नाही, म्हणून वडेट्टीवारांना अशा विधानांचा आधार घ्यावा लागत आहे, असा टोला त्यांनी लगावला.

## वाल्मिक कराड असलेल्या जेलमध्ये अंडरवेअरमध्ये निघाला चिरलेला रबरी बॉल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९बीड**

मागील काही दिवसांपासून बीड जिल्हा कारागृह सतत चर्चेचा विषय ठरत आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि त्याची टोळी सध्या याच कारागृहात शिक्षा भोगत आहे. वाल्मिक कराडला कारागृहात व्हीआयपी ट्रीटमेंट दिली जात असल्याचा आरोप झाल्यानंतर या कारागृहाची राज्यभरात चर्चा रंगली होती. तसेच कराड गँग आणि गित्ते गँग यांच्यात तुरुंगातच गँगवॉर झाल्याची घटना काही महिन्यांपूर्वी समोर आल्याने एकच खळबळ उडाली होती. आता बीड जिल्हा कारागृह पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

वाल्मिक कराड शिक्षा भोगत असलेल्या बीड जिल्हा कारागृहात एका आरोपीकडून गांजासदृश पदार्थ सापडल्याने खळबळ उडाली आहे. त्यामुळे




कारागृहामध्ये अंमली पदार्थांची तस्करी कोण करतंय? याबाबत विविध तर्कवितर्कांना ऊत आला आहे. संबंधित न्यायालयीन बंदीकडून गांजासदृश पदार्थ जप्त करण्यात आला असून, दोन शासकीय पंचांच्या उपस्थितीत जप्तीची कारवाई आणि पंचनामा करण्यात आला आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात संबंधित आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संपादकीय ......

# महती अमरनाथ यात्रेची

दरवर्षी श्रावण महिन्यात नैसर्गिकरीत्या तयार होणार्या शिवलिंगाच्या दर्शनासाठी देशभरातून लाखो भाविक अमरनाथ यात्रा करतात. ही यात्रा देशातील अन्य यात्रेच्या तुलनेत खडतर मानली जाते, तरीही धार्मिक श्रद्धेपोटी आणि पुण्य मिळवण्यासाठी भक्तांची दरवर्षी गर्दी उसळते. काहीवेळा दहशतवाद्यांचे सावट असले, तरी भाविक त्याची पर्वा न करता यात्रेत सहभागी होतात. यंदा पहलगाम हल्ल्यामुळे स्थिती संवेदनशील असल्याचे वाटत असतानाही भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली आहे.भारताची भूमी तीर्थक्षेत्रांनी व्यापलेली आहे. देशात असे कोणतेच राज्य नाही की, तेथे धार्मिक स्थळ, तीर्थस्थळ नसेल. धार्मिक ठिकाणं दीर्घकाळापासून श्रद्धेचे आणि अध्यात्माचे केंद्र राहिलेले आहे. यातही काश्मिरातील अमरनाथ तीर्थक्षेत्राला एक विशेष महत्त्व आहे. कल्हण यांच्या 'राजतरंगिनी'मध्ये या तीर्थक्षेत्राला अमरेश्वर असे म्हटले आहे. अमरनाथ हा शब्द हिंदीतील दोन शब्द म्हणजे 'अमर' अर्थात अनश्वर आणि 'नाथ' म्हणजेच ईश्वर यांना जोडून तयार झाला आहे. भारताच्या विविध क्षेत्रांत असलेले महादेवाची बारा ज्योतिर्लिंग सोमनाथ, मल्लिकार्जुन, महाकालेश्वर, ओंकारेश्वर, केदारनाथ, भीमाशंकर, काशी विश्वनाथ, वैद्यनाथ, त्र्यंबकेश्वर, रामेश्वरम, नागेश्वर अणि घृष्णेश्वर असून अमरनाथ याचे विशेष महत्त्व आहे. भगवान महादेवाच्या प्रमुख स्थानांपैकी एक असलेल्या अमरनाथाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणूनच अमरनाथ यात्रेला तीर्थाचे तीर्थ असे म्हटले जाते. मृत्यूवर विजय मिळवणारे मृत्युंजय शिव अमर आहे आणि त्यामुळे त्यांना अमरेश्वर असेही म्हटले जाते. भाविक मंडळी अमरेश्वर यांनाच बाबा अमरनाथ आणि बर्फानी बाबा असेही म्हणतात. अमरनाथ तीर्थक्षेत्र हे जम्मू काश्मीर राज्याची राजधानी श्रीनगरपासून १४१ किलोमीटर अंतरावर आणि समुद्रसपाटीपासून २,८८८ मीटर उंचीवर आहे. त्याच्या गुहेची लांबी १० मीटर, रुंदी सोळा मीटर आहे. ४० मीटर उंचीच्या अमरनाथ गुहेत पडणार्या पाण्याच्या थेंबाने बर्फाच्या रूपातून अलौकिक शिवलिंग तयार होते.एका पुराणकथेनुसार, भगवान शिवने पार्वतीला अमर होण्याचे रहस्य सांगण्यासाठी याच गुहेची निवड केली. कथेत सांगितल्याप्रमाणे जेव्हा देवी पार्वतीने भगवान शिव यांना अमरत्वाचे रहस्यभेद करण्यास सांगितले तेव्हा ते गूढ सांगण्यासाठी भगवान शिव हे पार्वतीला या गुहेत घेऊन गेले. हे रहस्य कोणाच्याही कानावर पडू नये, हा त्यामागचा हेतू होता. याच ठिकाणी भगवान शिव यांनी पार्वतीला अमरत्वाचे रहस्य सांगितले. इतिहासकारांच्या मते, अमरनाथ यात्रा ही हजारो वर्षांपासून सुरू असून अमरनाथ दर्शनाचे महत्त्व पुराणकथेतही सांगितले आहे. बृंगेश संहिता, नीलमत पुराण, 'कल्हण की रजितरंगिनी' आदीत या तीर्थक्षेत्राचा उल्लेख आहे. नीलमत पुराणकथेतील अमरेश्वरच्या संदर्भातील उल्लेख पाहता सहाव्या-सातव्या शतकातही लोकांना या तीर्थक्षेत्राची माहिती असल्याचे निदर्शनास येते.

दरवर्षी होणारी अमरनाथ यात्रा ही पुण्यफळप्राप्तीसाठी केली जाते. अमरनाथाचे दर्शन घेतल्याने आणि पूजा केल्याने महापुण्य मिळते, अशी अख्यायिका आहे. शास्त्रात इंद्रिय निग्रहवर विशेष भर दिला. यामुळे मोक्ष (मुक्ती) मिळतो, असे म्हणतात. शास्त्रांत म्हटल्यानुसार अमरनाथ यात्रा ही 'निग्रह' न करताही मोक्ष मिळवून देणारी यात्रा आहे. श्रावण महिन्यात पवित्र हिमलिंगाच्या दर्शनासाठी लाखो भाविक अनेक राज्यांतून या ठिकाणी येतात. अमरनाथ यात्रेशी संबंधित एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि व्यावहारिक तथ्य म्हणजे, ही यात्रा परस्पर सौहार्द, बंधूभाव, प्रेमाचा प्रसार आणि प्रचार करणारी आहे.

# वेलवर्गीय पिकांच्या चांगल्या वाढीसाठी, अधिक उत्पादनासाठी असे करा व्यवस्थापन

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक**

**वेलवर्गीय पिकांच्या (जैसे कि दोडका, कारला, मिरची, टोमॅटो) चांगल्या वाढीसाठी आणि अधिक उत्पादनासाठी खत व्यवस्थापन महत्वाचे आहे. सेंद्रिय खतांचा वापर करावा, तसेच रासायनिक खतांचा संतुलित वापर करावा. त्याचबरोबर कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी, हे समजून घेऊयात....**

कृषी विशेष




वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये माती परीक्षण करून संतुलित प्रमाणात खते वापरावी.

दोडका, कलिंगड, खरबूज पिकाला प्रति एकरी ४० किलो नत्र, २० किलो स्फुरद व २० किलो पालाश या प्रमाणात रासायनिक खतांची मात्रा आवश्यक आहे. यापैकी अर्धे नत्र (२० किलो), संपूर्ण स्फुरद (२० किलो) व संपूर्ण पालाश (२० किलो) लागवडीवेळी द्यावे.

नत्राची उर्वरित अर्धी मात्रा (२० किलो) लागवडीनंतर ३०, ४५ व ६० दिवसांनी तीन समान हप्त्यांत विभागून बांगडी पद्धतीने रोपांच्या बुंध्यापासून थोड्या अंतरावर मुळांच्या क्षेत्रात द्यावी. खते दिल्यानंतर ताबडतोब पाणी द्यावे.

काकडी, दुधी भोपळा, कारले पिकाला प्रति एकरी ४० किलो नत्र, २० किलो स्फुरद व २० किलो पालाश या प्रमाणात रासायनिक खतांची मात्रा आवश्यक आहे. यापैकी अर्धे नत्र (२० किलो), संपूर्ण स्फुरद (२० किलो) व संपूर्ण पालाश (२० किलो) लागवडीवेळी द्यावे.

नत्राची उर्वरित अर्धी मात्रा (२० किलो) लागवडीनंतर ३० व ४५ दिवसांनी दोन समान हप्त्यांत विभागून बांगडी पद्धतीने रोपांच्या बुंध्यापासून थोड्या अंतरावर मुळांच्या क्षेत्रात द्यावी. खते दिल्यानंतर ताबडतोब पाणी द्यावे.

सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असणाऱ्या जमिनीसाठी, आवश्यकतेनुसार लागवडीवेळी एकरी १० किलो फेरस सल्फेट, ८ किलो झिंक सल्फेट, ४ किलो मँगेनीज सल्फेट व २ किलो बोरॅक्स शेणखताबरोबर अथवा निंबोळी पेंडीसोबत मिसळून द्यावे.

**-ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी**


शेतकरी ते थेट ग्राहक

**कामधेनु नॅचरल्स**

उत्तम आहार सर्वोत्तम जीवन

विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी

समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती

नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०


# तुमच्यासोबतच तुमचं अख्खं कुटूंब राहील निरोगी, सुदृढ!

## ८ सवयी लावून घ्या, तब्येत राहील ठणठणीत

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक** -सध्या वाढतं वजन, कमी वयातच हृदयविकार, बीपी, शुगर, कोलेस्टेरॉल असे आजार होण्याचं प्रमाण खूप जास्त वाढलेलं आहे. हे सगळं टाळायचं असेल आणि स्वत:सोबतच अख्ख्या कुटूंबालाही निरोगी, सुदृढ ठेवायचं असेल तर या काही सवयी स्वत:ला लावून घ्या.






स्वत:ला आणि घरातल्या प्रत्येकाला जेवणाच्या आधी सॅलाड खाण्याची सवय लावा. तसेच जेवणात पोळी, चपातीचे प्रमाण कमी करून डाळ, भाजी यांचे प्रमाण वाढवा.

घाई गडबडीत, मोबाईल किंवा टीव्ही पाहात जेवण करणं टाळा. प्रत्येक घास शांतपणे चावून खा. जेवणावर लक्ष केंद्रित करा. यामुळे ओव्हरइटिंग टाळलं जातं.

बाजारात मिळणाऱ्या डाएट फूड, हेल्थ ज्यूस यांच्यापासून दूर राहा. पारंपरिक पद्धतीने घरी जो स्वयंपाक करतात, तोच खाण्यावर भर द्या.

बाहेरचे पदार्थ खाणं टाळा. घरी जेवण्याचे प्रमाण वाढवा.

तळलेले पदार्थ खाण्यापेक्षा रोस्ट, ग्रील, शिजवलेले, बेक केलेले पदार्थ खाण्यावर भर द्या.

आहारात प्रोटीनयुक्त पदार्थांचे प्रमाण वाढवा. लहान मुलांनाही लहानपणापासूनच प्रोटीन्स खाण्याची सवय लावा.दररोज एखादे फळ खायचेच हे ठरवून घ्या आणि फळांचा ज्सूस पिण्याऐवजी फळं चावून खाण्याला प्राधान्य द्या.रोज कोणता ना कोणता व्यायाम न चुकता करा. घरातल्या लहान मुलांना तसेच वयस्कर व्यक्तींनाही त्यांना जमेल तसे व्यायाम रोज करायला लावा.

# सांस्कृतिक कार्य विभागातर्फे सार्वजनिक गणेशोत्सव

## मंडळांकरिता राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन, ५ लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती-** पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या यतीने 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५' चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेचा अर्ज पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या असून अर्ज ऑनलाईन पोर्टलद्वारेच दि. २० जुलै पासून दि. २० ऑगस्ट २०२५ पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. अपूर्ण अर्ज रद्द ठरविण्यात येतील.

ही स्पर्धा निःशुल्क असून सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे यांविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्य, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट, ध्वनिप्रदूषण रहित वातावरण, गणेशभक्तासाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल.



२७ ऑगस्ट पासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सव स्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे आणि पुणे हे ४ जिल्हे प्रत्येकी ३ आणि हे ४ जिल्हे वगळता अन्य ३२ अशा प्रत्येक जिल्ह्यातून एक यानुसार एकूण ४४ शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी स्वीकारल्या जातील. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सर्वांनी आपापल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

राज्यस्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे ५ लाख, २.५ लाख आणि १ लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना रु. २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवण्याचे आवाहन राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.

# बुधागड येथील स्मशानभूमी धोकादायक स्थितीत

## शेड कोसळण्याच्या स्थितीत, तातडीने नवीन बांधकामाची गरज




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ बोरखडी खु. (ता. भातकुली) :** ६भातकुली तालुक्यातील बोरखडी खुर्द गट ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या बुधागड या सुमारे १२०० लोकसंख्येच्या गावातील हिंदू स्मशानभूमी सध्या अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. अंत्यविधीसाठी आवश्यक असलेल्या प्राथमिक सुविधांचा येथे अभाव असून, शेड पूर्णपणे जीर्ण झालं आहे.पावसाच्या दिवसांत अंत्यविधी करताना नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. जुनं शेड केव्हाही कोसळू शकतं, अशा स्थितीत असून, त्यामुळे मृत व्यक्तींच्या नातेवाईकांसह गावकऱ्यांना असुरक्षिततेचा सामना करावा लागत आहे.नागरिकांची मागणी:या ठिकाणी योग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची वारंवार मागणी करण्यात आली असून, ग्रामस्थांनी प्रशासनाकडे जुनं शेड तातडीने डिसमेंटल करून नवीन स्मशानभूमी शेड उभारण्याची जोरदार मागणी केली आहे.गावातील वयोवृद्ध, महिलांसाठी बसण्याची व्यवस्था नाही, पावसाळ्यात चिखल व पाण्यामुळे शेवटचा निरोप देतानादेखील अडथळे निर्माण होतात.

**प्रशासनाने तत्काळ लक्ष देण्याची गरज**

स्मशानभूमी हे गावाच्या सामाजिक-सांस्कृतिक व्यवस्थेतील अत्यावश्यक अंग असून, अशा ठिकाणी मूलभूत सुविधा असाव्यात, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. प्रशासनाने त्वरित उपाययोजना करावी, अन्यथा आंदोलनाचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# विद्यापीठ विकास मंचाचे कुलगुरूंना निवेदन

## विद्यापीठातील विविध विषयांवर चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती,** पंडीत दिनदयाल उपाध्याय यांच्या एकात्मिक मानवतावाद या विषयाला अनुसरून विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयां मध्ये कार्यक्रमांचे नियोजन करण्याच्या मागणीसह अन्य काही महत्त्वाच्या विषयांवर विद्यापीठ विकास मंच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या पदाधिकार्यांनी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्याशी शुक्रवारी चर्चा केली व निवेदन दिले.पंडीत दिनदयाल उपाध्याय यांनी एकात्मिक मानवतावाद या विषयावर २२ ते २५ एप्रिल १९६५ दरम्यान व्याख्यान दिले होते. यंदा त्या व्याख्यानाचा हिरक महोत्सव आहे. त्याला अनुसरून विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयांमध्ये कार्यक्रम व्हावे, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली आहे. त्या संदर्भातले एक पत्र त्यांनी सर्व विद्यापीठांना पाठविले आहे. त्या पत्राचे अवलोकन करून एकात्म मानव दर्शन यावर कार्यक्रम घेण्याचे नियोजन करावे, अशा मागणीचे निवेदन कुलगुरूंना देण्यात आले. याशिवाय राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संस्था चालकांची कार्यशाळा घेतल्यास गतीमानता वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. विद्यापीठ परिक्षेत्रातल्या औद्योगिक गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रम तयार करणे, रोजगाराच्या दृष्टीने विद्यमान अभ्यासक्रमात आवश्यक बदल करण्यासह अन्य विषयांवर चर्चा झाली. कुलगुरू डॉ. बारहाते यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. यावेळी प्र - कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे प्रामुख्याने हजर होते. चर्चेच्यावेळी विद्यापीठ विकास मंचाचे महराष्ट्र प्रदेश सचिव परमेश्वर हासबे, अभाविप विदर्भ प्रांत सहसंघटन मंत्री मनोज साबळे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रवींद्र कडू, मंचाचे मार्गदर्शक डॉ. राजेश जयपूरकर, मंचाचे निमंत्रक राजेंद्रप्रसाद पांडे, अधिसभा सदस्य प्रा. श्रीकांत काळीकर, डॉ. श्याम मुंजे, अमित देशमुख, ॲड. संकेत सावजी, ॲड. अमोल ठाकरे, सुनील तिपट्ट, गजानन कासावार, आशिष सावजी, गिरीश शेरेकर, पल्लवी कुळकर्णी, योगेश शेळके उपस्थित होते.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १९ जुलै २०२५

शहर/ग्रामिण

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा


## बँकांनी उद्योगाला कर्ज सुविधा देऊन अर्थव्यवस्थेला गती द्यावी-जिल्हाधिकारी येरेकर

### एक जिल्हा एक उत्पादन मान्यवरांना भेट देणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि १९ अमरावती,**

केंद्र आणि राज्य शासनाने छोट्या उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना आखल्या आहेत. सवलतीच्या दरात त्यांना कर्ज पुरवठा करून ग्रामीण भागातही उद्योग उभारणीला चालना देण्यात येत आहे. त्यामुळे बँकांनीही उद्योगांना कर्ज सुविधा देऊन अर्थव्यवस्थेला गती द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने शासकीय विभाग आणि बँकांच्या अधिकाऱ्यांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यावेळी परिविक्षाधीन अधिकारी कौशल्या एन., अग्रणी बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निलेश निकम, खादी ग्रामोद्योगचे व्यवस्थापक प्रदीप चेचेरे, कौशल्य विकासच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर, कृषी विभागाचे उपसंचालक वरूण देशमुख, पर्यटन विभागाचे विजय अवताडे, मावीमचे रंजन वानखेडे यांच्यासह विविध बँकांचे प्रादेशिक अधिकारी उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले, देशाने पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष ठेवले आहे. त्यामुळे खाजगी क्षेत्रात बँकांना गुंतवणूक करावी लागणार आहे. यात बँकांचा सहभाग महत्त्वाचा राहणार आहे.



बँकांनाही ही संधी समजून खाजगी क्षेत्रात सकारात्मक दृष्टिकोनातून काम करावे लागणार आहे. खाजगी क्षेत्रात गुंतवणूक करून नव्या नोकऱ्या निर्माण करणे गरजेचे आहे.उद्योजकांना सुलभता व्हावी, यासाठी प्रत्येक बँकेत बिझनेस फॅसिलेशन सेंटर असणे गरजेचे आहे. या कक्षाच्या माध्यमातून गुंतवणूक प्रशिक्षण आदींबाबत माहिती देण्यात यावी. यासोबतच उद्योजकांकडून शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून दाखल करण्यात येणाऱ्या प्रस्तावात त्रुटी राहू नये, यासाठीही प्रयत्न करावे. बँकांनीही प्रभाव पडू शकतील, अशी क्षेत्रे निवडून त्या उद्योगांचे कर्ज प्रस्ताव मंजूर करावेत.यावेळी खादी ग्रामोद्योग, कृषी, पर्यटन, आर-सेटी, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटके महामंडळ, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे महामंडळ, जिल्हा उद्योग केंद्र यांच्या उद्योग कर्जविषयक योजनांचा आढावा घेण्यात आला.एक जिल्हा एक उत्पादन ही आता जिल्ह्याची ओळख झाली आहे. सर्व शासकीय कार्यक्रमात मान्यवरांच्या स्वागताला आता या भेटवस्तू देण्यात येतील. यासाठी सर्व विभागाने कार्यवाही करावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी दिल्या. यावेळी शासकीय योजनांचे कर्ज प्रकरण मंजूर करण्यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

अग्रणी बँक व्यवस्थापक श्री. हेडाऊ यांनी प्रत्येक बँकेत बिझनेस फॅसिलेशन सेंटर उभारावे, तसेच विविध योजनांमध्ये माध्यमातून देण्यात येणारी कर्ज प्रकरणे निकाली काढावीत असे आवाहन केले. श्री. निकम यांनी प्रास्ताविक केले. श्री कादरी यांनी आभार मानले.

## पिकमोड नुकसान भरपाई न मिळाल्यामुळे
## संतप्त शेतकरी तहसील कार्यालयावर धडकले

### आदिवासी नेते तथा शिवसैनीक मन्ना दारसिंबे यांच्या नेतृत्वात निवेदन सोपवून तहसीलदारांशी चर्चा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९धारणी –** धारणी तालुक्यातील गडगामालुर गावातील आदिवासी शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयावर धडक देत पिकमोड नुकसान भरपाई रक्कम त्वरित अदा व्हावी अशी मागणी रेटून हक्काच्या रक्कमेपासून वंचित ठेवण्यात आल्याचा आरोप निवेदन सोपवून व्यक्त केला.आदिवासी नेता मन्ना दारसिंबे यांच्या नेतृत्वात झालेल्या या सत्याग्रही मार्गाने करण्यात आलेल्या आंदोलनामध्ये शेतकऱ्यांनी त्यांची व्यथा तहसिलदार प्रदीप शेवाळे यांच्या दालनापुढे मांडली. निवेदन स्वीकारून तहसीलदारांनी संबंधित प्रकरणाची त्वरित चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यासंदर्भात निर्देश दिले.धारणी तहसील कार्यालय हद्दीत येणाऱ्या गडगामालूर गावातील शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, गेल्या ऑगस्ट २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. असे असतानाही गडगामालूर येथील फक्त ७९ शेतकऱ्यांना शासनाच्या वतीने पिकमोड बाबत नुकसान भरपाई देण्यात आली, उर्वरित जवळपास दीडशे शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित ठेवण्यात आले आहे असा आरोप शेतकऱ्यांनी लावला. नुकसान भरपाई न मिळाल्यामुळे आर्थिक अडचणींमध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांनी महाराष्ट्र जनक्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष तथा नुकताच शिंदे शिवसेना मध्ये सामील झालेले मन्ना दारसिंबे यांच्या नेतृत्वाखाली तहसील कार्यालय गाठून आपल्या मागण्यांचा जोरदार पाढा वाचला. ज्यानंतर धारणीचे तहसीलदार प्रदीप शेवाळे यांनी उपस्थित शेतकरी वर्गाला नुकसान भरपाई बाबत शासनाचे नियम समजावून सांगितले व याबाबत चौकशी करून चौकशी अंतीयोग्य ती कारवाई केली जाणार असल्याबाबतचे आश्वासन दिले. तसेच शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## खापरा नदीला पूर - पूल वाहून गेला, पाच गावांचा संपर्क तुटला!




### मेळघाट परिसरात नागरिकांचे हाल; तातडीने पुलाच्या बांधकामाची मागणी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १९ मेळघाट**

मेळघाट तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे खापरा नदीला अचानक पूर आला असून, नदीवरील लहान व कमकुवत पूल पूर्णपणे वाहून गेला आहे. यामुळे खडीमल, नवलगाव, बिच्छुखेडा, माडीझडप आणि चुनखडी या पाच गावांचा मुख्य रस्त्याशी संपर्क तुटला आहे.या गावांतील नागरिक धारणी, परतवाडा, सेमाडोह व चिखलदरा या ठिकाणी दैनंदिन व्यवहार, वैद्यकीय सेवा, शिक्षण व इतर कारणांसाठी प्रवास करतात. मात्र आता पुल नसल्याने वाहनांची वाहतूक ठप्प झाली असून रुग्णवाहिका, अन्नधान्य आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी अडचणीचे संकट निर्माण झाले आहे.

स्थानिक नागरिकांनी याआधीच या पुलाच्या कमजोर स्थितीबाबत प्रशासनाचे लक्ष वेधले होते, परंतु कोणतीही उपाययोजना न झाल्याने आता पूरग्रस्त परिस्थितीत पुल वाहून गेला. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.गावकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने नवीन व मजबूत पुलाचे बांधकाम करण्याची मागणी केली आहे. तसेच पावसाळ्यात आणखी अडचणी वाढण्याआधी योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणीही करण्यात येत आहे.

**स्थानिकांची मागणी:**

आम्हाला रुग्णालय, बाजार व शाळा यासाठी दररोज या मार्गावरून जावे लागते. आता रस्ता नाही. प्रशासनाने लगेच कारवाई केली नाही, तर याचे गंभीर परिणाम होतील.

## महावितरणची जनसामान्यात प्रतिमा मलिन करणारा सहाय्यक अभियंता निलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती,** नेट मिटर बसविण्याकरीता रिलीज ऑर्डर काढण्यासाठी लाचेची मागणी करणे आणि लाचलूचपत विभागाने रचलेल्या सापळा कारवाई दरम्यान लाच स्विकारल्याप्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अंतर्गत गुन्हा दाखल होऊन अटक होणे हे दोन्ही कृत्य महावितरणची जनसामान्यातील प्रतिमा मलिन करणारे असल्याने सहाय्यक अभियंता वरूड -२ उपविभाग , यांना महावितरणच्या सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. मुख्य अभियंता यांनी ही कारवाई केली आहे.महावितरणकडून ग्राहकाभिमूख सेवा देण्याचा सर्वोत्तोपरी प्रयत्न करण्यात येत आहे.तथापि लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार सहाय्यक अभियंता वरूड -२ उपविभाग , यांनी तक्रारदार दिलीप शंकरराव खेरडे ,व्यवसाय सोलर कृष्णा सोल एनर्जी यांना विक्रांत झामडे आणि सुनिता झामडे यांच्या घरी प्रत्येकी दोन किलोवॅटचे रूफ टॉपसाठी नेट मिटर




काढण्याकरीता लाचेची मागणी केली आणि लाचलुचपत विभागाने केलेल्या सापळा कारवाई दरम्यान लाच स्विकारल्याप्रकरणी त्यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमाअंतर्गत पोलीस स्टेशन वरूड येथे (दि.५ जुलै) गुन्हा दाखल होऊन अटक करण्यात आली आहे.मुळात महावितरणच्या कामासाठी लाच मागणे आणि लाच स्विकारल्या प्रकरणी गुन्हा दाखल होऊन अटक होणे, सहाय्यक अभियंता यांचे हे दोन्ही कृत्य अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहे आणि महावितरण सेवाविनिमय २००५ च्या तरतुदीच्या विरोधात आहे. त्यामुळे सहाय्यक अभियंता यांना महावितरण च्या सेवेत राहू देणे हे महावितरणच्या हितसंबंधास आणि कामकाजात बाधा निर्माण करणारे असल्याने महावितरणकडून ही निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.-

## अप्पर वर्धा धरण तहानलेलेच जलाशयात पाणीसाठा ४८.५१ टक्के




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मोर्शी–** मोर्शी पासून अवघ्या ८ कि. मी. अंतरावर असलेल्या अप्पर वर्धा धरणाच्या जलाशयाची पातळी दि. १८ जुलै रोजी ३३८.६८ एवढी भरली असून नळ दमयंती सागर ४८.५२ टक्के भरले आहे. अप्पर वर्धा धरणाची निर्धारित जलाशयाची पातळी २४२.५० एवढी ठेवण्यात आली आहे. यावर्षी पावसाळा सुरू झाल्यावर सुद्धा मोर्शी तालुका तसेच मध्यप्रदेश व धरण परिसरात दमदार पाऊस न झाल्याने अप्परवर्धा धरणात पाहिजे त्या प्रमाणात पाण्याचा साठा झाला नाही.अप्पर वर्धा धरणाच्या जलाशयातून मोर्शी, वरुड, अमरावती, रतन इंडियाबुल्स पावर प्रोजेक्त, एमआयडीसी यासह हिवरखेड, लोणी, राजुरा इत्यादी गावात पाणीपुरवठा होत आहे. या गावाला वरदान ठरलेले हे जलाशय जुलै महिन्यात सुद्धा तहानलेले आहे. साधारणपणे जुलै महिन्यात पाऊस मोठ्या प्रमाणात कोसळत असतो परिणामी अप्पर वर्धा धरणाच्या जलाशयातीलपाण्याच्या पातळीत झपाट्याने वाढ होत असते. मागील वर्षी ५ ऑगस्टला अप्पर वर्धार धरणाच्या तेरा गेट पैकी दोन गेट उघडण्यात आली होती त्यानंतर १२ ऑगस्ट रोजी १३ पैकी १९ पेट ४० सेंटीमीटरने उघडण्यात येऊन ६९० क्यूसेक घनमीटर प्रति सेकंद पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला होता. १४ ऑगस्ट रोजी अप्पर वर्धा धरणाला तिरंग्याची विद्युत रोषणाई करण्यात आल्यामुळे या रंगीबेरंगी आकर्षक रोषणाईने पर्यटकांच्या डोळ्यात भुरळ घालण्यात आली होती. यावर्षी जुलै महिन्याचे २० दिवस संपत आले तरी जलाशयाच्या पातळीत वाढ झाली नाही उलट मागील वर्षी पेक्षा पाण्याची पातळी घटत चालली आहे. त्यामुळे अप्पर वर्धा धरणाला पाण्याची प्रतीक्षा लागली आहे. दरवर्षी अप्पर वर्धा धरणाच्या पाण्याची पातळी पूर्ण होत असल्याने काही दरवाजे जुलै महिन्यात उघडल्या जातात. त्यामुळे या ठिकाणी पर्यटकांची मोठी गर्दी असते. परंतु यावर्षी अर्धा पावसाळा संपत आला व धरण परिसरात पाऊस न बरसल्याने या धरणाचा पाण्याचा साठा वाढला नसल्याने अजून पर्यंत धरणाचे गेट उघडले नाही. पर्यायाने पर्यटकांचा सुद्धा हिरमोड होत आहे.१८ जुलै पर्यंत परीसरात २०९ मिमी पाऊस झाला असून पुढील आठवड्यात दमदार पाऊस होऊन हे धरण पाण्याने भरेल अशी अपेक्षा नागरिक करीत आहे.-

## विधान परिषदेत गाजला फेक वेडिंगचा मुद्दा

### कारवाईची आ. श्रीकांत भारतीय यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई–** शंकर नगर मार्गावरील एरिया ९१ या रेस्ट्रो बारमध्ये दीडशे हुन अधिक अल्पवयीन युवक युवती यांनी फेक वेडिंग पार्टी साजरी केल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला होता. या प्रकरणात आज आमदार श्रीकांत भारतीय यांनी विधान परिषदेत पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन द्वारे मुद्दा उपस्थित केला. यावेळी त्यांनी संबंधितांवर कारवाईची मागणी त्यांनी केली.स्थानिक शंकर नगर येथील एरिया ९१ रेस्ट्रो बारमध्ये फेक वेडिंग पार्टीचा मुद्दा सध्या सर्वत्र गाजत आहे. याच आठवड्यात याठिकाणी फेक वेडिंगची पार्टी जल्लोषात साजरी झाली होती. पोलिसांनी छापामार कारवाई करून



दीडशेहून अधिक ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली. इंस्टाग्राम व अन्य युवती व युवकांना सोशल मीडियावर फेक वेडिंग पार्टीची जाहिरात करण्यात आली होती. युवतींना मोफत प्रवेश तर युवकांकडून चारशे रुपये घेण्यात आल्याचे तपासात पुढे आले होते.सदर प्रकरणात आज विधान परिषद सदस्य श्रीकांत भारतीय यांनी पॉईंट ऑफ इनफॉर्मेशन द्वारे सभागृहात मुद्दा उपस्थित केला.सदर प्रकार हा अत्यंत बिभत्स व निंदनीय असल्याचे ते म्हणाले.

अशा पार्टीद्वारे अमरावती शहरात ड्रग्स विक्रीचा गोरख धंदा सुरू होण्याची शक्यता देखील वर्तविण्यात आली. फेक वेडिंग पार्टीच्या माध्यमातून गैरप्रकार देखील होऊ शकतात. त्यामुळे संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली.दरम्यान, सभापती राम शिंदे यांनी यासंदर्भात महसूल मंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना स्पष्टीकरण देण्यास सांगितले. पालकमंत्री चंद्रशेखर बवनकुळे यांनी आपण उद्या शनिवारी स्वतः अमरावतीला जात आहे. संपूर्ण प्रकरणाची माहिती घेऊन आपण योग्य कार्यवाही करू असे ते म्हणाले.


## सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुकांसाठी निवडणूक अधिकारी पॅनेल जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती,** विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी 'ई' वर्गातील सहकारी गृहनिर्माण संस्था, म्हणजेच ज्या संस्थांमध्ये २५० पर्यंत किंवा त्यापेक्षा कमी सदस्य आहेत, त्यांच्या आगामी निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे पॅनेल तयार करण्यात येणार आहे. यासाठी पात्र व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सहकार संकुल, कांता नगर, अमरावती येथील विभागीय सहनिबंधक कार्यालयामार्फत कळविण्यात आले की, निवडणूक निर्णय अधिकारी पॅनेलमध्ये समाविष्ट होण्यासाठी शासकीय विभागातील किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमधील कार्यरत अधिकारी-कर्मचारी, वरिष्ठ लिपिक किंवा त्याहून अधिक दर्जाचे कर्मचारी, प्रमाणित लेखापरीक्षक, वकील तसेच शासकीय किंवा निमशासकीय संस्थेतून निवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी (ज्यांचे वय ६५ वर्षांपेक्षा जास्त नाही) अर्ज करू शकतात. या पॅनेलसाठी आवश्यक असलेले विहित नमुन्यातील अर्ज येत्या २१ जुलै २०२५ पासून ते २१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत उपलब्ध असतील. हे अर्ज शासकीय सुट्ट्या वगळून, कार्यालयीन वेळेत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांच्या कार्यालयात (सहकार संकुल, कांता नगर) मिळवता येतील. कार्यालयाच्या जाहीर नोटीस बोर्डवरही अर्जाचा नमुना प्रसिद्ध करण्यात आला आहे. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, शंकर कुंभार यांनी अर्जदारांना आवाहन केले आहे की, आपले अर्ज २१ ऑगस्ट २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत संबंधित कार्यालयात सादर करावेत. यामुळे 'ई' वर्गातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका वेळेत आणि पारदर्शकपणे पार पाडण्यास मदत होईल.

# मेगा टेक्टाईल पार्क, भारत डायनॅमिक्स, रेमंड उद्योग विकासासाठी धोरण गरजेचे

## अमरावतीत औद्योगिक अनुशेष दूर कारण्यासाठी आ. संजय खोडके यांची चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई-**
अमरावतीच्या औद्योगिक वसाहतींमध्ये उद्योग उभारण्यासाठी लागणारी सर्व नैसर्गिक व भौतिक संसाधने उपलब्ध आहेत. पाण्यासह वीज, वाहतूक सेवा, दळणवळणाच्या सोयी आणि मनुष्यबळ तसेच गुंतवणूकदारही उपलब्ध आहेत. औद्योगिकीकरणाला चालना देण्यासाठी पोषक स्थिती असूनही जिल्हाच नव्हे तर पूर्ण विभाग उद्योगांमध्ये मागासलेला आहे. केंद्र शासनाच्या स्टार्टअप इंडियाच्या माध्यमातून देशात तसेच राज्यात लघू-सूक्ष्म व मध्यम उद्योगांना भरभराट मिळत असताना अमरावतीच्या बाबतीत मात्र दुर्लक्ष होत असल्याने अमरावतीची औद्योगिक क्षेत्रात मोठी पीछेहाट झाली आहे. आज अमरावतीचे दरडोई उत्पन्न हे राज्यात सर्वात कमी आहे. जिल्ह्यातील उद्योगांची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे.



शासनाने अमरावतीमध्ये उद्योगांच्या बाबतीत जे काही यंत्रणा उभ्या केल्या आहेत, त्या पुढे जाण्यासाठी आज शासनाने एक सुयोग्य धोरण ठरविण्याची नितांत गरज असल्याचे अभ्यासपूर्ण विवेचन आ. संजय खोडके यांनी राज्यविधिमंडळात मांडले.

त्यांनी सभागृहात अर्धा तास अमरावतीच्या औद्योगिक विकासावर भाष्य करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच शासनाचे लक्ष वेधून अमरावतीचा औद्योगिक अनुशेष - कारणे आणि उपाययोजना या संदर्भात विस्तृतपणे चर्चा केलीपीएम मित्र मेगा टेक्स्टाईल पार्क साकारण्यात आला. एमआयडीसीने त्याठिकाणी चांगल्या सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

संत्रा उत्पादनाला पाठबळाची गरज १८ हजार हेक्टरमध्ये संत्रा पिकांची लागवड होते. जिल्ह्यात संत्रा उत्पादनाला सुद्धा चालना देण्याची गरज आहे. यासाठी अमरावतीमध्ये संत्रा पिकांवर प्रक्रिया करणारे उद्योग स्थापन करण्याबाबत शासनाने सकारात्मक धोरण ठरविण्याची सूचना सुद्धा आमदार संजय खोडके यांनी केली.

जागेचे दर १३०० वरून ६०० रुपये स्केअर फूट मेगा टेक्स्टाईल पार्कमध्ये प्लॉटचे दर अधिक आहेत. इतर मेगा टेक्स्टाईल पार्कमध्ये प्लॉटचे दर २४० रुपये स्केअर फूट आहेत, तर अमरावतीच्या मेगा टेक्स्टाईल प्लॉटमध्ये प्लॉटचे दर ५९० रुपये स्केअर फूट आहेत. त्यामुळे तिथे गारमेंट कंपनी गुंतवणूक करून पाहत नाही. तेव्हा अन्य ठिकाणच्या किंवा राज्यशासनाच्या टेक्स्टाईल पार्कमधील प्लॉटचे दर तपासून अमरावतीच्या मेगा टेक्स्टाईल पार्कमध्ये प्लॉटचे दर निश्चित केल्यास नामांकित कंपन्या अमरावतीला गुंतवणुकीसाठी येतील. त्यावर अमरावतीचा पीएम मेगा टेक्स्टाईल पार्क चांगल्या पद्धतीने विकसित होईल, असे आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले. मेगा टेक्स्टाईल पार्कमधील जागेचे दर १३०० वरून ६०० रुपये स्केअर फूट करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# रेल्वे घडविणार दोन ज्योतीर्लिंगासह दक्षिण भारताची यात्रा

### पर्यटनाचा आनंद : प्रवासासोबत राहण्या-खाण्याचीही व्यवस्था

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नागपूर-** प्रवाशांना दोन प्रसिद्ध ज्योतीर्लिंगांच्या दर्शनासह दक्षिण भारताची यात्रा घडवून आणण्याची योजना भारतीय रेल्वे कॅटरिंग अ‍ॅन्ड टूरिजम कॉर्पोरेशनने (आयआरसीटीसी)ने जाहिर केली आहे. आयआरसीटीचे कार्यकारी अधिकारी राहूल होळकर यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

१० दिवस आणि ११ रात्री, अशी ही यात्रा राहणार असून २१ ऑगस्ट २०२५ ला ती भारत गौरव ट्रेनने मध्य प्रदेशातील रिवा सतना येथून सुरू होणार आहे. स्लिपर कोच, थर्ड एसी आणि सेकंड एसी अशा वेगवेगळ्या कोचमधून प्रवासी त्यांच्या सोयीनुसार तिकिट काढू शकतात. त्यासाठी क्रमशः २०,८०० रुपये, ३५,००० रुपये आणि ४६,५०० रुपये प्रति व्यक्ती असा या यात्रेचा खर्च राहणार आहे. प्रवाशांना सकाळच्या चहा नाश्त्यापासून तो दुपार आणि रात्रीच्या शुद्ध शाकाहारी जेवणापर्यंतची सुविधा, श्रेणीनुसार हॉटेलमधील मुक्काम, दर्शनीय



स्थळांवर जाण्यासाठी टूरिस्ट बसेसची सुविधा हे सर्व याच खर्चात समाविष्ट असून या सर्व व्यवस्थेची जबाबदारी आयआरसीटीसीकडे राहणार आहे. यात्रेत सहभागी प्रवाशांना विम्याचे कवच रेल्वेकडून दिले जाणार आहे. भाविकांना सोयीचे व्हावे म्हणून ठिकठिकाणी टूर एस्कॉर्टस्, टूर मॅनेजर आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांची व्यवस्थाही रेल्वेकडून केली जाणार आहे, असे होळकर यांनी पत्रकारांना सांगितले. चुकून यात्रेची तारिख अथवा कोणत्याही नियोजित कार्यक्रमात बदल झाला तर रेल्वे प्रशासनाकडून पर्यायी व्यवस्था केली जाईल, असे एका प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी सांगितले.

# प्रा. डॉ. रश्मी गजरे सोमवारी आकाशवाणीवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती :** - सामाजिक जाणीव ठेवणाऱ्या प्राध्यापिक म्हणून परिचित असलेल्या डॉ. रश्मी प्रवीण गजरे यांची मुलाखत सोमवार दि. २१ जुलै रोजी सकाळी १० वाजता अमरावती आकाशवाणीवरून प्रसारित होणार आहे. विविधा या मालिकेत 'नमस्कार अमरावती' या लोकप्रिय कार्यक्रमातून डॉ. गजरे श्रोत्यांशी संवाद साधतील. आकाशवाणीचे नैमित्तिक उद्धोषक नितीन भट त्यांच्याशी संवाद साधतील. महिला सक्षमीकरण अंतर्गत ग्रामीण महिलांना उद्योजकता प्रशिक्षण, पोषक आहार विषयक खाद्य पदार्थांचे कृती प्रात्याक्षिकासह मार्गदर्शन आणि महिला आरोग्य विषयक जागृती अशा विषयांवर ते मुलाखतीतून प्रकाश टाकतील. अमरावती येथील रहिवासी असलेल्या डॉ. रश्मी गजरे यवतमाळ येथील श्रीमती नानकीबाई वाधवानी कला महाविद्यालयात गृह अर्थशास्त्र विभागाच्या प्रमुख आहेत. खासदार सुप्रिया सुळे यांच्यातर्फे चालविल्या जाणाऱ्या 'यशस्वीनी' अभियानाअंतर्गत बचतगटांना उद्योजकता प्रशिक्षणातील प्रशिक्षक म्हणून त्या काम करतात. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील गृह अर्थशास्त्र अभ्यासमंडळाच्या त्या सदस्य देखील आहेत. सामाजिक कार्यासोबतच पाकशास्त्र आणि अभिनय हे त्यांच्या आवडीचे विषय असून त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. या मुलाखतीचा आस्वाद घेण्याचे आवाहन आकाशवाणी अमरावतीचे कार्यक्रम प्रमुख भय्यालाल टेकाम, वरिष्ठ उद्घोषक संजय ठाकरे आणि कार्यक्रम अधिकारी विनोद गवळी यांनी केले आहे.



# विठुराया एस टी महामंडळाला पावला१ कोटी ६४ लाखांचे उत्पन्न

## ४० हजार वारकऱ्यांचा लालपरी मधून प्रवास

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१९अमरावती** - महाराष्ट्राचे आराध्य दैवत पंढरपुरच्या पांडुरंगचरणी नतमस्तक होण्यासाठी यावर्षी जिल्ह्यातून १ लाखापेक्षा अधिक वारकऱ्यांनी वारी केली.. त्यापैकी ४० हजार वारकऱ्यांनी एसटी महामंडळाने विठोबाचे दर्शन घडविले. विशेष म्हणजे गतवर्षी पेक्षा यावर्षी विठोबा महामंडळाला पावला असून वारकऱ्यांसोबतच उत्पन्नामध्ये सुध्दा वाढ झालेली आहे. महामंडळाला १ कोटी ६४ लाखांचे उत्पन्न मिळाले आहे.महाराष्ट्राचे आराध्यदैवत विठूरायाच्या दर्शनासाठी आषाढी यात्रेनिमित्त अमरावतीमधून श्रीक्षेत्र पंढरपुर येथे मोठ्या संख्येने भाविक जात असतात. या भाविकांना त्यांच्या गावापासून पंढरपूरपर्यंत ने-आण करण्यासाठी एसटीने अमरावती विभागातून १७३ बसेसद्वारे ५१७ फेऱ्या सोडल्या होत्या. ३ ते १३ जुलैदरम्यान या बसमधून ४० हजार ७९६ भाविकांना सुरक्षीत प्रवास करविला. त्यातून अमरावती जिल्ह्याला पंढरपूर वारीमुळे १ कोटी ६४ लाख ६३ हजार ११० रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे.अमरावती जिल्ह्यातून आषाढी वारीसाठी १७३ बस धावल्या आहेत. या बसद्वारे सुमारे ४० हजार ७९६ वारकऱ्यांनी पंढरपुरला जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेतले आहे. यंदा अम रावती विभागातून पंढरपुरला जाणाऱ्या भाविकांची संख्या वाढली आहे. एसटी महामंडळाच्या १७३ बसेसने २ लाख ७६ हजार ६९६ किलोमीटरचा प्रवास केलाअसून आषाढी वारीसाठी हजारो भाविकांना सुखरुप देवदर्शन घडवून आणण्यासाठी हजारों एसटी महामंडळाचे चालक, वाहक यांत्रिकी कर्मचारी व त्यांना मार्गदर्शन करणारे अधिकाऱ्यांनी अहोरात्र सेवा बजाविली आहे.



# कुरैशी समाजाने नांदगाव खंडेश्वर तालुक्यामध्ये घातली जनावरांच्या खरेदी-विक्रीवर बंदी

### समाजाच्या बैठकीत ऐतिहासिक निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नांदगाव खंडेश्वर** - कुरैशी समाजाने आता सामाजिक पातळीवर प्राण्यांच्या खरेदी विक्रीवर पूर्णपणे बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे.स्थानिक कुरैशीपुरा येथील समुदाय बांधवांनी आयोजित केलेल्या बैठकीत घेतलेला हा निर्णय २१ जुलैपासून लागू होईल. त्यांनी घेतलेल्या या निर्णयाची माहिती देताना कुरेशी समाजाच्या सदस्यांनी सांगितले की, गोहत्या प्रतिबंधक कायद्यामुळे गायींव्यतिरिक्त इतर प्राण्यांची वाहतूक करताना गो तस्करीच्या संशयावरून कुरैशी समाजाच्या व्यापाऱ्यांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.यामुळे कुरैशी समाज बांधवांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. त्यामुळे, जोपर्यंत सरकार गोहत्या प्रतिबंधक कायद्यात सुधारणा करत नाही आणि कुरैशी समुदायाची सुरक्षितता सुनिश्चित करत नाही, तोपर्यंत कुरैशी समुदायाकडून जनावरांची खरेदी-विक्री करण्याचा व्यवसाय पूर्णपणे बंद राहील.या बैठकीत नांदगाव खंडेश्वर शहर आणि तालुकमधील कुरैशी समुदायाचे प्रमुख अधिकारी, धार्मिक नेते आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी शेख हाजी मुमताज कुरैशी होते. त्यांनी सांगितले की, हा निर्णय केवळ व्यावसायिक नाही, तर धार्मिक आणि सामाजिक जबाबदारीचे प्रतीक आहे. सरकार



गतले की, गोहत्या प्रतिबंधक कायद्यावर संशोधन करून समाजात एक निष्पक्ष आणि सुरक्षित वातावरण निर्माण करत नाही तोपर्यंत हा निर्णय लागू राहील. या निर्णयामागील त्यांचा उद्देश धार्मिक असल्याचेही त्यांनी सांगितले. भावनिक होण्याचीगरज नाही, उलट त्यांना परस्पर सौहार्द आणि समंजसपणाने या समस्येवर तोडगा काढायचा आहे.या बैठकीत शहर तालुकचे उपाध्यक्ष जावेद खान कुरैशी, सचिव याह्या खान कुरैशी, तहसील अध्यक्ष मोहम्मद रियाज कुरैशी, उपाध्यक्ष शेख नाझीम कुरैशी पापल, सचिव शेख मुस्ताक कुरैशी सालोंड, रफिक भाई कुरेशी पापल, शेख जुबैर धामक, मोहम्मद कुरैशी, आदि उपस्थित होते. बैठकीला इम्रान धामक, अ. कादिर कुरैशी पिंपळगाव, यासीन खान कुरैशी सालोड, शेख इर्शाद कुरैशी वाढोण, इत्यादी कुरैशी समाजाचे नागरिक उपस्थित होते.

कुरैशी समाजाच्या बैठकीत प्राण्यांच्या खरेदी-विक्रीवर बंदी घालण्याचा निर्णय हा बराच चर्चेचा विषय आहे आणि आता सर्वांच्या नजरा या मुद्यावर सरकार काय कारवाई करते याकडे लागल्या आहेत.

# परतवाडा पोलिसांच्या कस्टडीतील आरोपी फरार

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१९ परतवाड़ा-** अचलपूर तालुक्यातील म्हसोना निवासी नामदेव बळीराम दहीकर (३५) याने भावाशी वाद करत प्राणघातक हल्ल्याप्रकरणी पोलिसांच्या ताब्यात असलेला आरोपी नामदेव दहीकर यास परतवाडा पोलिस तपासा करीता घटनास्थळी गेले असता नामदेव पोलिसांना चकमा देत फरार झाला.परतवाडा पोलिस स्टेशन हद्दीतील रहिवाशी पोलिस पाटील देवेंद्र गुलाबराव खंडेझोड यांच्याशेतात रखवालदार असलेले बळीराम बाबा दहीकर (६०) हे गावात सणाकरीता कुटुंबियासोबत आले हाते. विलास बळीराम दहीकर (३१) यास नामदेव बळीराम दहीकर याने पैसे मागीतले. विलास याने पैसे देण्यास नकार दिला. नामदेव दहीकरयाने विलास दहीकर यांच्यावर लोखंडी पाईपने डोक्यावर प्राणघातक हल्ला करून हत्या करण्याचा प्रयत्न केला. जखमी युवकाचे वडिल बळीराम बाब्या दहीकर यांच्या तक्रारीवरुन परतवाडा पोलिसांनी नामदेव दहीकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करत ताब्यात घेतले असता आज पोलिसांनी घटनास्थळी तपासाच्या अनुषंगाने आरोपीला घेऊन गेले असता त्याने पळ काढला. पोलिस म्हसोना परिसरात नामदेव चा शोध घेत आहे.



# पंडित दीनदयाल महारोजगार मेळावा २२ जुलै रोजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि१९ अमरावती,**
जिल्ह्यातील तरुण-तरुणींसाठी महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय आणि सुशिला सूर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ऍडव्हान्समेंट यांच्या संयुक्त विद्यमाने २२ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती येथे पंडित दीनदयाल महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात रेमंड लक्झरी कॉटन, दामोदर इंडस्ट्रीज, गुरुलक्ष्मी कोटेक्स, फ्लिपकार्ट, मुरली टोयोटा , बजाज ऑटो यांसारख्या अनेक नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे, पात्र उमेदवारांना त्याच दिवशी नियुक्ती पत्रे दिली जातील. इच्छुक उमेदवारांनी ... संकेतस्थळावर निःशुल्क ऑनलाईन नोंदणी करावी, किंवा मेळाव्याच्या ठिकाणीही नोंदणीची सोय उपलब्ध असेल. जिल्हा कौशल्य विकास केंद्राच्या सहायक आयुक्त यांनी जास्तीत-जास्त युवकांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.-




# मनपा शाळा, शिक्षक सक्षमीकरणास 'विनोबा'चा हात

## महापालिका आणि ओपन लिंक्स फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने नव्या शैक्षणिक पर्वाचा प्रारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**
शासकीय शालेय शिक्षणात गुणवत्ता आणि नवोपक्रम आणण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या संकल्पनेतून महापालिकेने शुक्रवारी 'आचार्य विनोबा भावे शिक्षक सहायक कार्यक्रमा'चा शुभारंभ केला आहे.

पुणे येथील ओपन लिंक्स फाउंडेशनच्या सहकार्याने राबवला जाणारा हा उपक्रम जिल्ह्यातील शिक्षकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिक सक्षम बनवून त्यांच्या कार्याला नवी दिशा देणार आहे. या कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे 'विनोबा प'चा प्रभावी वापर. संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षकांना परस्परांशी जोडून, त्यांच्यात संवाद साधून आणि नवनवीन कल्पनांची देवाणघेवाण करण्यास प्रोत्साहन देऊन शिक्षकांत उत्साह निर्माण करण्यात विनोबा पने यश मिळवले आहे. या पमुळे शिक्षक नवनवीन शैक्षणिक उपक्रम राबवू शकतील.

मनपा अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक तसेच मनपा उपायुक्त डॉ. मेघना वासनकर यांच्या मार्गदर्शनात शिक्षण विभागातर्फे विविध नवनवीन उपक्रम राबवले जात असून त्यामुळे पटसंख्येत वाढ झाल्याचे चित्र दिसून येते. त्याच प्रमाणे या उपक्रमामुळे केवळ शिक्षकांचे सक्षमीकरणच होणार नाही, तर प्रशासकीय स्तरावरही याचा मोठा फायदा होणार आहे. विविध शैक्षणिक कार्यक्रमांची अंमलबजावणी यामुळे अधिक सुलभ आणि वेगवान होईल. विनोबा पद्वारे निर्माण होणारा हा गतिमान संवाद व सहभागाचा दुवा प्रशासनाला शिक्षकांपर्यंत



पोहोचण्यास, कार्यक्रम प्रभावीपणे राबवण्यास मदत करेल.

या निमित्ताने मनपाचे शिक्षणाधिकारी, केंद्र प्रमुख आणि तंत्रस्नेही शिक्षक यांची एकदिवसीय कार्यशाळा आयुक्तांच्या सभागृहात नुकतीच आयोजित केली होती. या प्रसंगी मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक म्हणाल्या की आचार्य विनोबा भावे शिक्षक सहायक कार्यक्रम हा केवळ तंत्रज्ञानाचा अवलंब नसून, तो शिक्षकांना प्रेरणा देऊन आणि प्रशासकीय प्रक्रिया अधिक कार्यक्षम बनवून शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न आहे. या उपक्रमामुळे मनपाच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याची पायाभरणी होईल, याची आम्हाला खात्री आहे. या वेळी ओपन लिंक फाउंडेशनचे सीडीएम विजय वावगे, जिल्हा प्रकल्प अधिकारी सागर गजभिये, कार्यक्रम व्यवस्थापक रघुनाथ वानखडे यांच्यासह मनपाच्या प्रत्येक शाळेतील तंत्रस्नेही केंद्रप्रमुख व शिक्षक उपस्थित होते. शिक्षक हेच खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्माते आहेत. विनोबा पच्या माध्यमातून त्यांना जोडण्यासाठी, शिकण्यासाठी आणि प्रगती करण्यासाठी एक शक्तिशाली साधन उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे, ज्यामुळे वर्गातील अध्ययनानुभव खऱ्या अर्थाने बदलून जाईल. मनपा आणि ओपन लिंक्स फाउंडेशन या उपक्रमाचा दूरगामी सकारात्मक परिणाम सुनिश्चित करण्यासाठी कटिबद्ध आहेत, ज्यामुळे शालेय शिक्षणात एक नवीन आणि उत्कृष्ट पर्व सुरू होईल, अशी आशा ओपन लिंक्स फाउंडेशनचे सीडीएम विजय वावगे यांनी व्यक्त केली.

# आंबिया संत्राफळांना आलेत 'अच्छे दिन'

## ४ ते ५ हजार रुपये प्रतिहजार भावाने विक्रमी खरेदीला प्रारंभ : अनेक वर्षांनंतर संत्रा उत्पादकांना दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

यंदाच्या चालू हंगामात २५ ते ३० टक्क्यांच्या मयदित आंबिया बहराची फळे शिल्लक राहिलेली आहे. सुरुवातीच्या काळात काढलेली अल्प प्रमाणातील फूट, अतिउष्णतेमुळे झालेली संत्रा फळगळ, पावसाळयात झालेली बुरशीजन्य पिवळी होऊन गळलेली फळे यांमुळे आंबिया बहराच्या संत्राफळांना प्रतिहजार ४ ते ५ हजार रुपये विक्रमी भाव मिळण्याची शक्यता आहे. उच्चप्रतीच्या दर्जेदार बागांना खरेदी करण्यासाठी व्यापाऱ्यांमध्ये चांगलीच होड लागल्याची चिन्हे दिसण्यास सुरुवात झालेली आहे.



चांदूरबाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा येथे अमरावती, वरुड, मोर्शी, अचलपूर येथीलच नाही, तर सौंसर (मध्यप्रदेश), गाझियाबाद (उत्तरप्रदेश), राजस्थान येथील व्यापाऱ्यांना संत्राबागा खरेदी करण्याची होड लागण्यास सुरुवात झाली आहे. या दराने खरेदी होत असल्याने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.यावर्षी संत्राबागांवर फुलधारणातर झालीः परंतु त्याचे रूपांतर फळांत झाले नाही, तसेच जानेवारी महिन्यात नवती व फुलधारणेच्या क्रियेमध्ये सिट्रससायला रोगाने झाडांचे शेंडे वाळवून टाकले; परिणामी झाडांवर फुटीच्या तुलनेत फळे कमी आहेत, असे अनेक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. सुरुवातीच्या काळातबाजारपेठेत आवक कमी राहून भावांमध्ये आणखी तेजी येण्याची शक्यता नाकारता येत नाही. यंदा मृग बहरातील संत्र्याचे दर ५५ हजार रुपये टनावर पोहोचले होते. सप्टेंबर मध्ये बाजारात उच्चप्रतीच्या फळांना ६० रुपयेप्रतिकिलो दर मिळण्याचा अंदाज तज्ज्ञांकडून वर्तविला आहे.

### विमा ट्रिगर कालावधी वाढविण्याची शेतकऱ्यांची मागणी

पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेत अवेळी पाऊस, कमी-जास्त तापमान, गारपीट विमा सीमित न ठेवता ऑक्टोबर महिन्यापर्यंत वाढविण्यात शेतकऱ्यांचे हित आहे. संत्रा हे वार्षिक पीक असल्याने विमा कवच हे संपूर्ण वर्षभर असायला पाहिजे. वेगाच्या वाऱ्यांमुळे संत्र्याचे नुकसान होत असल्याने याचा समावेश विमा योजनेत करण्यात यावा, असे संत्रा उत्पादक शेतकरी पुष्पक खापरे यांनी सांगितले.

### फक्त २५ ते ३० टक्के संत्रा उत्पादकांना चढ्या दरांचा फायदा

अमरावती जिल्ह्यात संत्रापीक ८२ हजार ३७८ हे. क्षेत्राखाली आहे. यापैकी आंबिया बहार अंदाजे ६५ हजार हेक्टर क्षेत्रावर घेतला जातो. फेब्रुवारी-मार्च आंबिया बहाराकरिता फुटीनंतर फळे सेट होण्याचा काळ असून यावर्षी याच वेळेत तापमानाने चाळीशी गाठली. त्यांचा थेट परिणाम फूट-फळगळीवर झाल्याने सद्यस्थितीत एकूण २५ ते ३० टक्के संत्रा शिल्लक असल्याचे शेतकऱ्यांनी म्हटले आहे.

# कमी पैशात सोन्याच्या गिन्या देणाऱ्या टोळीचा मुख्य सूत्रधार अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

कमी पैशात सोन्याच्या गिन्या देण्याची बतावणी करूनएका महिलेकडील ३ लाख रुपये घेऊन पळ काढणाऱ्या टोळीच्या मुख्य सूत्रधाराला स्थानिक गुन्हेशाखेने अटक केली. त्याच्यासोबत त्याच्या एका साथीदाराला ताब्यात घेण्यात आले. १८ जुलै रोजी ही कारवाई करण्यात आली. लक्ष्मण देविदास जाधव (६२, रा. सोमठाणा ह.मु. कारंजा जि. वाशिम) अत्ते अटकेतील मुख्य सूत्रधाराचे नाव आहे, तर त्याच्यासोबतच, कैलास भाऊराव जाधव (३८, रा. सावंगी ता. दारव्हा जि. यवतमाळ) यालादेखील अटक करण्यात आली.



नांदेड जिल्ह्यातील सारखनी येथील पधिनी नामक ४५ वर्षीय महिलेला कमी पैशाच्या मोबदल्यात सोन्याच्च्या गिन्या देण्याचे आमिष दाखविण्यात आले होते. १७ जून रोजी त्यांना त्यासाठी आरोपी दीपक पल्हाडे (रा. गोंडवडसाता, किनवट जि. नांदेड) याने नांदगाव खंडेश्वर हद्दीतील एका ठिकाणी बोलावले होते. त्या आल्या असता त्यांना सोन्याच्या बनावट गिळ्या दाखवून मारहाण करण्यात आली होती. पल्हाडे व त्याचे अन्यसाथीदार पद्मिनी यांच्याकडील ३ लाख रुपये जबरीने घेऊन चारचाकी वाहनाने पळून गेले होते. त्याप्रकरणी नांदगाव खंडेश्वर पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता.ही कारवाई स्थानिक गुन्हेशाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात पीएसआय मुलचंद भांबुरकर, हे. कॉ. अमोल देशमुख, मंगेश लकडे, सचिन मसांगे, दिनेश कनोजिया, चालक प्रज्वल राऊत यांनी केली. पुढील कारवाईकरिता आरोपीना नांदगाव खंडेश्वर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# धामणगावात अवैध रेती वाहतुकीला लगाम

## उपविभागीय अधिकारीसह तहसीलदारांची धडाकेबाज कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९धामणगाव रेल्वे**

महसूल विभागाच्या पथकाने अवैध रेती वाहतूक करणारे दोन ट्रक महामार्गावर थांबवले. सदर ट्रक चोरीची रेती वाहतूक करीत असल्याचे आढळून आले असता उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे व तहसीलदार अभय घोरपडे यांच्या आदेशाने मुद्देमालासह ट्रक जप्त करण्यात आले.गुरुवार १७ जुलै रोजी रात्री ११ वा. च्या दरम्यान उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे व तहसीलदार अभय घोरपडे यांच्या मार्गदर्शनात महसूल पथक गस्तीवर असताना मौजा धामणगाव रेल्वे हद्दीमध्ये अवैध गौणखनीज वाहतूक करतानाबारा चाकी मोठे दोन ट्रक आढळून आले. सदर ट्रकचे ट्रक क्रमांक एम.एच. २७ डिटी ५१६६ व एम. एच. २७ डिटी ९५९५ हे दोन्ही ट्रकचे चालक ज्ञानेश्वर थोरात (४२) रा. पहूर ता. नांदगाव खंडेश्वर वकुलदीपवरघट (३५) रा. वडाळी विटाभट्टी व मालक अमरावती यांना दोन्ही ट्रकला थांबवून वाहतुकीचा परवाना विचारला असता त्याच्याकडे कुठलाही परवाना आढळून आला नाही. सदर ट्रकचे मालक आशिष कदम रा. पोटे कॉलनी अमरावती व संतोष रामराव वैद्य रा. शिवनी रसुलापूर ता. नांदगाव खंडेश्वर, जिल्हा अमरावती व चालक मालकाच्या सांगण्यावरून त्यांनी बाम्बर्डी ता. वरोरा जिल्हा चंद्रपूर येथील रेती घाटातून विनापरवाना आणत असल्याचे समोर आले.

प्रत्येकी ट्रकमध्ये अंदाजे १० ब्रास काळी रेती ही शिवनी रसुलापूर ता. नांदगाव खंडेश्वर येथे घेऊन जात असताना मुद्देमालासह ट्रकाचे व रेतीचे पंचासमक्ष पंचनामा करण्यात आलेला असून दंडात्मक कारवाईकरिता ट्रक तहसील कार्यालय येथे लावण्यात आला आहे. सदर गौणखनीज कारवाई उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे व तहसीलदार अभय घोरपडे यांच्या मार्गदर्शनात मंडळ अधिकारी विजय वानखडे, ग्राम महसूल अधिकारी गोपाल नागरिकर, दिनेश ठाकरे, विनोद मस्के, आकाश चव्हाण, सागर भांडवले यांच्या पथकाने केली.

# ई-बसेससाठी अमरावतीकरांना करावी लागणार आणखी आठ महिने प्रतीक्षा

## आगार व चार्जिंग स्टेशनची निविदा अंतिम टप्प्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

महापालिकेच्या शहर परिवहन सेवेत लवकरच चाळीस ई-बसेस दाखल होणार आहेतः मात्र त्यासाठी आणखी आठ महिने प्रतीक्षा करावी लागणार आहे. या बसेससाठी आगार व चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठी कोडेश्वर मार्गावरील जमीन देण्यात आली असून निविदा प्रक्रिया या महिन्यात पूर्ण करण्यात येणार आहे.

शहर परिवहन सेवा (आपली परिवहन) सध्या कंत्राटावर सुरू असून प्रवासी संख्या व वाहतूक मार्गाच्या तुलनेत तो कमी आहे.महापालिकेसाठी पन्नास ई-बसेस मंजूर झाल्या. त्यापैकी ३२ सीटर चाळीस ई-बसेस येणार आहेत. ही सेवा चालविण्याकरिता कंत्राटदार नियुक्त झाला असून बसेस त्यांच्याच असणार आहेत. महापालिका सेवेसाठी त्याला ६३.४५ रुपये प्रति कि. मी. टिपिंग शुल्क देणार आहे. बसेसच्या चालकांचे वेतन कंत्राटदार देणार असून वाहकांच्या वेतनाचा भार महापालिका उचलणार आहे. दोन ते अडीच कोटी रुपये एका बसची किंमत असून सेवेत रुजू होणाऱ्या बसेसची क्षमता ३२ आसनांची आहे. एका वेळेस एकूण चाळीस प्रवासी प्रवास करू शकणार आहेत.सध्या सुरू असलेल्या बससेवेसाठी वापरात असलेल्या मार्गासोबतच शहरालगतच्या मार्गावरही ई-बसेस धावणार आहेत. सद्यस्थितीत नांदगावपेठ औद्योगिक क्षेत्रापर्यंत शहर बससेवा असून ई-बसेस आल्यानंतर लोणी, भातकुली, वलगाव हे मार्गही सुरू करण्यात येणार आहेत.



**ई-बसेससाठी आगार व चार्जिंग स्टेशन उभारण्यात येत असून त्यासाठी कोंडेश्वर मार्गावरील जागेची निवड करण्यात आली आहे. आगारबांधणी व चार्जिंग स्टेशनसाठी निविदा प्रक्रिया या महिन्यात अंतिम होणार आहे.**

**- स्वप्नील जसवंते, कार्यशाळा प्रमुख.**

# धारणीत जियोचे नेटवर्क बंद;

## नागरिकांना प्रचंड मनस्ताप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९धारणी**

येथे जियोचे टॉवर बंद असल्याने जनजीवन ठप्प झाले. महत्त्वाची सर्व कामे रखडल्या गेले. जियो चे नेटवर्क मेळघाटमध्ये नेहमी अधूनमधून बंद असते मेळघाटमध्ये सर्वाधिक जियोचे टॉवर आहेत. म्हणून या कंपनीचे ग्राहक सर्वाधिक आहेत. महिन्याला तीनशे ते पाचशे रुपयांच्या रिचार्ज मारला जातो. असे हजारो जियोचे ग्राहक मेळघाटात आहेत. त्यामुळे या नेटवर्कचे नागरिकांना फायदा होण्याऐवजी बरेच नुकसान होत आहे. याचा कंपनीलामोठा फायदा होतो. या नेटवर्क बंदमुळे महत्त्वाची कामे रखडली जात आहेत.

यावेळी शेतीचे कामे मोठ्या प्रमाणात सुरू असून त्यांना नेटवर्क नसल्याने संपर्क करण्यास अडचणी येत आहेत. त्याचप्रमाणे यावेळी शाळांमध्ये मुलांना प्रवेश सुरू आहेत. त्यासाठी आवश्यक डॉक्युमेंट्स ऑनलाईन काढावे लागते; परंतु जियोचा असाच लपंडाव सुरू असल्याने मेळघाटमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसान होऊ शकते. इतर व्यावहारिक महाडीबिटी योजनाचे प्रक्रिया नेट नसल्याने ठप्प झाली आहे. याबाबत दूरसंचार विभागाने मेळघाटमधील दूरसंचार व्यवस्थेकडे लक्ष घालणे गरजेचे आहे.

# गंगाजळी परिसरात बिबट्याचा वावर

## गावाच्या सीमेवर व विरुळ रस्त्यावरचा व्हिडीओ व्हायरल : शेतशिवारात शेतकरी, शेतमजुरांमध्ये दहशत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९धामणगाव रेल्वे**

धामणगाव रेल्वे शहरापासून थोड्या अंतरावर असलेल्या गंगाजळी गावाच्या सीमेवरील व शेतशिवारात बिबट्या आढळून आल्याने परिसरात दहशत निर्माण झाली आहे. मागील दोन-चार दिवसांत सोशल मीडियावर गंगाजळी परिसरात विरुळ रस्त्यावर बिबट्या दिसल्याचा व्हिडीओ व्हायरल होत असल्याने भीती पसरली आहे. सदर व्हिडिओ मंगळवारी रात्रीच्या दरम्यान काढण्यात आला असल्याची माहिती मिळाली असून बुधवार रोजी गंगाजळी येथे कार्यक्रम आटपून दोन युवक दुचाकीने येत असताना त्यांना गावानजीक बिबट्या दिसल्याची माहिती परिसरातील नागरिकांनी दिली आहे.शेतीचे कामे सुरू असून



शेतकऱ्यांनी, नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी सावध राहण्याची गरज आहे. सध्या शेतांमध्ये खत देणे, डवरणी व निंदनाचे काम सुरू आहे. दरम्यान खत देणे, डवरणी व निंदनाची कामे करणे आता गरजेचे असताना नागरिकांत भीती निर्माण झाल्याने कामे रखडली आहे.विरुळ रोधे, तरोडा,गंगाजळी परिसरातील जंगलात बिबट असल्याची माहिती वन विभागालासुद्धा असल्याचे बोलले जात आहे. सदर घटनेची माहिती वनविभागाला देण्यात आली आहे. या बिबट्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट हिंस्त्र प्राणी आहे. तो केव्हाही हल्ला करू शकतो. त्यामुळे परिसरात तसेच गावात दहशतीचे वातावण असून शेतीची कामे खोळंबली आहे

### वनविभागाने बिबट्याला जेरबंद करावे

वनविभागाने या बिबट्याला जेरबंद करावे. बिबट्याला जेरबंद करण्यात न आल्याने शेतकरी शेतमजूर हवालदिल झाले आहेत. बिबट्याच्या दहशतीमुळे या भागातील शेतीची आंतर मशागतीवी कामे ठप्प पडली आहे. बिबट्याची परिसरात भीती निर्माण झाली आहे. भविष्यात अनुचित घटना घडल्यास त्याला जबादार कोण राहील? त्यामुळे वनविभागाने बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# शेतकऱ्यांनो जरा जपून ! शेतमाल विक्री व्यवहारात बनावट काटा पट्टी

## बाजारसमिती प्रशासन 'अलर्ट' मोडवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९धामणगाव रेल्वे :**

शेतमाल विक्री व्यवहारात बनावट काटापट्टी वापरून एका अडत्याने चक्क कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पारदर्शी प्रशासनाला सुरुंग लावला आहे. दरम्यान संचालक मंडळाने त्या अडत्यावर कारवाई केली असून बाजारसमिती प्रशासन अलर्टझाले आहे.शेतीचे उत्पन्न घरात आले की घेतलेले कर्ज फेडून व्यवहार टिकून राहावा, यासाठी शेतकरी अडत्यामार्फत आपला शेतमाल कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्रीकरिता आणतो. नेहमीच्या अडत्याकडे शेतमाल आणला की त्याच्या मालाला भाव मिळविण्यापासून तर सौदा पट्टी, हिशोबपट्टी, बिलबुक व काटा पट्टी सर्वच अडत्याकडे सोपवून शेतकरी विश्वासाने थांबतो. मात्र येथील बाजारसमितीमधील एका अडत्याने चक्क बनावट काटापट्टी तयार शेतकऱ्यांना करून लुटल्याचाधक्कादायक प्रकार समोर आला आहे.



काही दिवसांपूर्वी बाहेर गावावरून एका शेतकऱ्याने चणा बाजारसमितीत आणून आपल्या मालाचे खरेदी-विक्रीचे व्यवहार विश्वासने संबंधित अडत्यावर सोपवले. दरम्यान त्याचा चणा विकून मिळालेल्या मूळ रकमेत अफरातफर करण्याच्या उद्देशाने संबंधित अडत्याने चक्क बनावट काटापट्टी तयार करून कृषी उत्पन बाजार समिती व शेतकऱ्याची फसवणूक केल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. सदर प्रकरणी कृषी उत्पन बाजारसमितीने कारवाई केल्याचे सांगण्यात आले असून काही दिवसांपूर्वी झालेल्या या गंभीर प्रकरणात समिती प्रशासन अलर्ट झाले आहे.

# मंगल कार्यालयातील वाया गेलेले अन्न नदीत टाकतांना अपघात

## रिक्षासह चालक तिवसा येथील पिंगळाई नदीपात्रात कोसळला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९तिवसा**

मालवाहतूक तीनचाकी रिक्षागाडीने नजीकच्या मंगल कार्यालयामधील वाया गेलेले अन्न गोळा करून ते रिक्षाचे साह्याने नदीपात्रात टाकत असताना रिक्षासह चालक तिवसा येथील पिंगळाई नदीपात्रात कोसळला असून रिक्षा चालक गंभीर जखमी झाला आहे.रिक्षा चालक गजानन क्षीरसागर (५२) असे रिक्षा चालकाचे नाव आहे. त्यांनी सकाळी ८.३० वाजताच्या



दरम्यान मंगल कार्यालयामधील केरकचरा तसेच वाया गेलेले अन्न आपल्या मालवाहतूक तीन चाकी रिक्षा गाडीने तिवसा येथील पिंगळी नदीचे लहान जुन्या पुलाच्या किनाऱ्यावर रिक्षा उभा करून टाकत असताना अचानकपणे रिक्षा नदीपात्रात पलटी झाला. गजाननलादेखील रिक्षा आवरता न आल्याने तो रिक्षासोबत १२ फूट खोल असलेल्या नदीपात्रात जाऊन कोसळला. नदीपात्रात असलेले दगडाचा मार गजाननाला लागल्यामुळे तो जखमी झाला. तातडीने काही तरुणांनी धावपळ करून त्याला बाहेर काढण्यात आले व उपचारा करिता उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# संघटित समाजाचं नुकसान कोणीही करू शकत नाही - पालकमंत्री बावनकुळे

## तेली समाजाचा राज्यस्तरीय उद्योजक मेळाव्याला प्रचंड प्रतिसाद : गुणवंतांचा सन्मान, नवउद्योजकांना मार्गदर्शन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

समाज संघटित असेल, तर कोणताही संघर्ष निर्माण होऊ शकत नाही. एकटा विरोधक किंवा बाहेरचा कितीही प्रयत्न केला, तरी तो संघटित समाजाचं नुकसान करू शकत नाही, असे स्पष्ट मत राज्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले, प्रत्येकाने समाज संघटित करण्यासाठी पुढे आले पाहिजे. संघटित समाज हेच त्याचे खरे बळ आहे. संघर्ष टाळण्यासाठी, स्वाभिमान जपण्यासाठी आणि प्रगती साधण्यासाठी समाजात ऐक्य व एकजूट अत्यावश्यक आहे.

बावनकुळे यांचे हे भाष्यअमरावती मध्ये तेली समाजाच्या राज्यस्तरीय उद्योजक मेळाव्यात झाले, जिथे समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

अमरावतीच्या सांस्कृतिक भवन येथे कैलास-छाया गिरोळकर चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने तेली समाजाचा राज्यस्तरीय उद्योजक मेळावा भव्यदिव्य स्वरूपात संपन्न झाला. या कार्यक्रमाला राज्याचे ऊर्जा मंत्री व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.या

### समाज भूषण गुणवंतांचा झाला सत्कार

**इयत्ता दहावी व बारावीमध्ये गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसेच विविध क्षेत्रात उत्तुंग यश प्राप्त करून नावलौकिक प्राप्त करून तेली समाजाचे भूषण ठरणाऱ्या गुणवंतांचा सत्कार या कार्यक्रमात करण्यात आला.**

मेळाव्यादरम्यान राज्यभरातून आलेल्या तेली समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा व शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा बावनकुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी समाजातील कार्यकर्त्यांनी त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना अभिनंदनाचे पुष्पगुच्छ अर्पण केले.

समाजातील तरुणांनी उद्योग क्षेत्रात देखील भरारी घ्यावी, यासाठी नवउद्योजकांना प्रोत्साहित करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. सुप्रसिद्ध उद्योग प्रशिक्षणतज्ज्ञांच्या माध्यमातून नवउद्योजकांना व्यवसायवृद्धी, निधी व्यवस्थापन, आणि मार्केटिंग यासारख्या विविध बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमात समाज एकत्र येऊन आर्थिक आणि सामाजिक उन्नती साधू शकतो, हा विश्वास अनेक वक्त्यांनी व्यक्त केला. कैलास-छाया गिरोळकर ट्रस्टने आयोजिलेल्या या मेळाव्यामुळे तेली समाजात एक सकारात्मक ऊर्जा संचारली असून, नव्या पिढीसाठी हा मेळावा प्रेरणादायी ठरणार आहे.

या मेळव्यास महाराष्ट्र प्रांतिक तेली समाजाचे प्रदेशाध्यक्ष माजी खासदार रामदास तडस, माजी राज्यमंत्री जगदीश गुप्ता हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते समाजातील विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्ती यांची विशेष अतिथी म्हणून विशेष उपस्थिती होती .

अंबानगरी अमरावतीत प्रथमच आयोजित या अभिनव मेळाव्यास समस्त तेली समाज बांधवांनी व उद्योजकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजकांकडून येणाऱ्या प्रत्येक पाहुण्यांची व्यवस्था उत्तम करण्यात आली असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.

# गजानन महाराज पालखी ३१ला पोहचणार शेगावात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९बुलढाणा**

'पंढरीच्या राया प्रभू दिनानाथा, आज्ञा द्यावी आता येतो आम्ही' या संत श्रेष्ठ नामदेवांच्या अभंगाप्रमाणे भावविवश होत विदर्भ पंढरी शेगाव येथील गजानन महाराजांच्या पालखीने मागील १० जुलै रोजी पंढरपूरचा निरोप घेतला. गुरुपौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर सातशे वारकऱ्यांचा समावेश असलेल्या या पालखीने स्वगृही शेगावकडे प्रस्थान केले. सध्या मराठवाडामध्ये असलेली ही पालखी येत्या २३ जुलै रोजी बुलढाणा जिल्ह्यात प्रवेश करणार आहे. यानंतर सुवर्ण महोत्सवी पालखी स्वगृही म्हणजे शेगाव येथे ३१ जुलै रोजी डेरेदाखल होणार आहे.



आषाढी एकादशी वारीत आलेली ही पालखी पंढरपूर येथील श्री गजानन महाराज संस्थान शाखा पंढरपुर येथे ९ जुलैपर्यंत विसावली होती. येथून श्रींचा पालखी सोहळा पहाटे ३ वाजता काल्याचे कीर्तनाकरता गोपाळ पुरी येथे मार्गस्थ झाला. श्री गजानन महाराज संस्थानची पालखी पंढरपूरकडे शेगाववरून सातशेच्यावर वारकऱ्यांसह २ जुन रोजी पंढरपूरकडे रवाना झाली होती. ४ जुलै रोजी पंढरपूर येथे पोहोचली. आषाढ एकादशी उत्सवसाठी ४ ते ९ जुलै श्री क्षेत्र पंढरपूर येथे मुक्कामी होती.

श्रींच्या पालखीचा शेगावसाठी परतीचा प्रवास १० जुलै रोजी पंढरपूर येथून सुरू झाला. परतीच्या प्रवासादरम्यान पहिला मुक्काम करकंब, ११ जुलै कुईवाडी मुक्काम, १२ ला उपळाई स्टेशन मुक्काम, १३ ला भगवान बार्शी येथे मुक्काम, १४ ला भुम मुक्काम, १५ ला. चौसाळा मुक्काम, १६ ला. पाली १७ ला बीड, १८ ला. गेवराई , १९ ला.शहापूर मुक्कामी होती.२० ला लालवाडी मुक्काम करून २१ व २२ ला जालना मुक्कामी राहणार आहे.

२३ ला पालखी बुलढाणा जिल्ह्याच्या सीमेत प्रवेश करणार आहे. मा जिजाउंचे माहेर असलेल्या सिंदखेडराजात पहिला मुक्काम राहणार आहे. २४ ला बिबी मुक्काम, २५ ला. सरोवर नगरी लोणार , २६ ला.मेहकर , २७ ला जानेफळ , २८ ला शिर्ला नेमाने , २९ ला आवार आणि , ३० ला खामगाव मुक्कामी राहणार आहे. ३१ ला पालखी शेगाव येथे दाखल होणार आहे.

**तेराशे किलोमीटरचा प्रवास**

श्रींच्या पालखी सोहळ्याचे हे ५६ वे वर्षे असून पायदळ वारीची यशस्वी परंपरा कायम आहे. शेगाव ते पंढरपूर आणि पंढरपूर ते शेगाव असा जाण्यायेण्याचा मिळून १३०० कि.मी. चा पायदळ प्रवास वारकरी पूर्ण करणार आहेत.

# अमरावती शहरात सहा महिन्यांत २० खून हल्ल्यात २३ जण मरता-मरता वाचले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

शहर आयुक्तालयात जानेवारी ते जून या सहा महिन्यांच्या कालावधीत एकूण २० खून नोंदविले गेले, तर खुनाचा प्रयत्न या शीर्षकाखाली एकूण २३ एफआयआर नोंदविले गेले. गतवर्षीच्या तुलनेत यंदाच्या पहिल्या सहा महिन्यात खुनाच्या गुन्ह्यात सहाने वाढ नोंदविली गेली. मात्र, त्याचवेळी खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यात सातने घट नोंदविली गेली.

कोल्ड पत्नीचा ब्लडेड मर्डर करून तिचा मृतदेह घरात दडवून पती पसार झाला होता. २



जानेवारी रोजी भीमटेकडी रोडवरील भोवते ले आऊटमध्ये ती घटना उजेडात आली होती, तर १ फेब्रुवारी रोजी तपोवन परिसरातील संस्कृती नामक तरूणीच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. २३ फेब्रुवारी रोजी रहाटगाव येथील फार्म हाऊसमध्ये पती पत्नीचा मृतदेह आढळून आला होता. त्यात तीन दिवसांनी मृत पतीविरुद्ध पत्नीच्या खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. २

**शहराची व्याप्ती अलीकडे अधिकच वाढली आहे. त्यामुळे पोलिसांवरदेखील अधिक ताण येतो. यंदाच्या सहा महिन्यात खुनाचे गुन्हे वाढले असले, तरी खुनाचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्यात मोठी घट झाली आहे.**

**- शिवाजीराव बचाटे, एसीपी, क्राईम**

मार्च रोजी स्थानिक मसानगंज भागात आदर्श गुप्ता याची चाकूने भोसकून हत्या करण्यात आली होती. त्यानंतर मार्चमध्येच हार्डकोअर क्रिमिनल गोंडीचा खून झाला होता.

वाहनाचा कट जरी लागला तरी तरूण गुन्हेगारांकडून चायना चाकू उगारला जातो. रागाने बघितले तरीही चाकू काढल्याचे उदाहरणे आहेत.


शहरात गेल्या काही वर्षांपासून नशेखोरीला उत आला आहे. शहरात अलीकडे एमडी ड्रग्सदेखील पकडण्यात आले. तर काही ठिकाणांहून गांजादेखील जप्त करण्यात आला.

शहराचा तार झाला के तपोवन पडीसी या या पोलिस गरज आहे. शहरातील दहा पोलिस ठाण्याच्या हद्दीत जानेवारी ते जून या कालावधीत २० जणांचे खून करण्यात आले. तर २३ जणांवर प्राणघातक हल्ला करण्यात आला.बहुतांश खुनाच्या प्रकरणातील आरोपींना अटक करण्यात शहर गुन्हे शाखेची दोन्ही युनिट फ्रंटफूटवर राहिली. क्राईम युनिटनेच खुनाच्या अनेक आरोपींचा त्वरेने शोध लावला.शहर आयुक्तालयात गेल्या सहा महिन्यात बीएनएसच्या कलम १०९ अन्वये २३ एफआयआर नोंदविले गेले. त्या २३ जणांवर प्राणघातक हल्ला करण्यात आला. ते मरता मरता वाचले.यंदाच्या पहिल्या सहा महिन्यात २० जणांचे खून करण्यात आले. त्यात खुनाच्या सर्वाधिक घटना या आपसी वैर, वर्चस्ववाद व खुन्नस दिल्याच्या कारणावरून झाल्याचे निरीक्षण आहे.

# पिंपळखुटा (लहान) शेतशिवारात विजेचा घात ५२ वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ मोर्शी**

तालुक्यातील निंभी येथील शेतकरी मधुकर मुकुटराव पैठणकर (वय ५२) यांचा शुक्रवार, दिनांक १८ जुलै रोजी पिंपळखुटा (लहान) शेतशिवारात वीज पडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना शिरखेड पोलीस स्टेशनच्या हद्दीत सायंकाळी साडे पाचच्या सुमारास घडली.



मधुकर पैठणकर यांचे वडिलोपार्जित पाच एकर शेतीचे क्षेत्र पिंपळखुटा शिवारात असून, नेहमीप्रमाणे ते शेतीच्या कामासाठी शेतात गेले होते. याच दरम्यान आकाशात ढग दाटून आले आणि विजेच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. दुर्दैवाने याच वेळी मधुकरराव यांच्या अंगावर वीज कोसळली आणि त्यातच त्यांचा जागीच मृत्यू झाला.सायंकाळी घरी न परतल्यामुळे त्यांचा पुतण्या संदीत राजू पैठणकर यांनी शेतात जाऊन पाहणी केली असता काका मृतावस्थेत आढळून आले. त्यानंतर त्यांनी त्वरित निंभी गावातील महिला पोलीस पाटील सविता राऊत यांना घटनेची माहिती दिली. पोलीस पाटील यांनी शिरखेड पोलीस स्टेशन व मोर्शी महसूल विभागाला कळविले.शिरखेड पोलिसांचे पथक व तलाठी घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा करून मृतदेह मोर्शी उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी रवाना करण्यात आला. दुसऱ्या दिवशी, शनिवार दिनांक १९ जुलै रोजी मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. निंभी येथे शोकमग्न वातावरणात मधुकर पैठणकर यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.या प्रकरणी शिरखेड पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून, पुढील तपास सुरू आहे.

# मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या समस्यांवर वनमंत्र्यांशी आमदारांची सखोल चर्चा

## वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली आमदार काळेंची मुंबई येथे बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९धारणी**

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या समस्या आणि विकासकामांचा आढावा घेण्यासाठी राज्याचे वनमंत्री गणेशजी नाईक यांच्या अध्यक्षतेखाली आमदार केवलराम काळे यांची एक महत्त्वपूर्ण बैठक सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे नुकतीच पार पडली त्या बैठकी मध्ये मेळघाटमधील विविध समस्या आणि प्रलंबित विकासकामे याबाबतचे निवेदन वनमंत्र्यां समोर सादर केले.



मेळघाट व्याघ्र प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या अनेक गावांमध्ये अद्याप पर्यंत विद्युत पोहोचली नाही त्यासह रस्ते नसल्याने अजूनही आदिवासी बांधवांना दळणवळणाच्या सोयी सुविधा नाही आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी विद्युत लाईन नाही याला वनविभागाचा अडथळा निर्माण होत अनेक आदिवासी बांधवांना समस्येच्या माहेरघरातून अद्यापही जावे लागत आहे तेथे सोयी सुविधा निर्माण करताना वनविभागाच्या परवानग्या अभावी विकास कामे रखडलेली आहे त्यामध्ये ३३ केव्ही जरीदा सब स्टेशन,धुळघाट रेल्वे ते झरी रोड रस्त्याचे काम,परतवाडा ते धारणी महामार्गाचे अपूर्ण काम,मेळघाटमधील मोबाईल नेटवर्क अभाव, काकादरी ते गरजदारी रस्ता,चिखलदरा - मोथा - शहापूर - गोल रस्ता या सर्वकामांच्या मंजुरीसाठी वनविभागाच्या परवानग्या तातडीने देण्यात याव्यात, अशी विनंती आमदार केवळराम काळे नी केली दुर्गम व आदिवासी भागाच्या दळणवळण आणि विकासासाठी या सुविधा अत्यंत गरजेच्या आहेत, असे मत त्यांनी व्यक्त केले. या निवेदनातील प्रत्येक मुद्द्यावर वनमंत्र्यांनी सकारात्मक चर्चा करून लवकरच आवश्यक निर्णय घेण्यात येतील अशी आशा व्यक्त केली आहे.

# उत्सवांचा महिना श्रावणाची लागली चाहूल.....बाजारात असते उल्हासाचे वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ अमरावती**

आषाढी एकादशी आटोपली की, भाविकांना सण-उत्सवांचा महिना श्रावणाची चाहूल लागते. यंदा गुरुवारी (दि.२४) आषाढ आमावस्या आटोपली की, शुक्रवारपासून (दि.२५) श्रावण महिन्याला सुरुवात होणार आहे. या महिन्यात सृष्टीला जसा पाना, फुलांना बहर येतो, त्याचप्रमाणे सण-उत्सवांचीही चंगळ राहणार आहे.

श्रावणाच्या जिवतीसारख्या सुरुवातीला सणामुळे बाजारातही चैतन्य संचारते. असलेल्या स्त्रिया जिवती देवीचे व्रत मोठ्या भक्तिभावाने पाळतात. या निमित्ताने बाजारातही उल्हासाचे आणि रंगतदार वातावरण निर्माण होते. फुलांची गजबज, पूजेचे साहित्य, वाणाचे सामान,उत्साह, या सर्व गोष्टींनी बाजारपेठ गजबजते. सणासुदीचा हंगाम सुरू झाल्याने दुकानदारांकडून विविध सवलती, नवीन स्टॉक आणि आकर्षक सजावट केली जाते. ग्राहकांची महिला खरेदीसाठी विशेष गर्दी दिसून येते. श्रावण शुद्ध पंचमी अर्थात नागपंचमीला मंदिरांसह घरोघरी नागदेवतेची पूजा होणार असून फुलोरा, हलव्याचा प्रसाद घरोघरी करून त्याचे वितरण केल्या जाते.

**मंगळागौरी व राखीचाही वाढतोय उत्साह**

सुवासिनी श्रावणातील दर मंगळवारी मंगळागौरीचे व्रतही



करतील. आठ ऑगस्टला नारळी पौर्णिमा तसेच २ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाचा सण साजरा होणार आहे. शुक्रवारी १५ तारखेला राष्ट्रीय उत्सव स्वातंत्र्य दिन शासकीय कार्यालये तसेच शाळा-महाविद्यालयांसह विविध ठिकाणी साजरा होणार असून याच दिवशी श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त घरोघरी श्रीकृष्णाचा पाळणा, मूर्तीचे पूजन होणार आहे. श्रावण महिन्यातील पिठोरी अमावास्या २२ ऑगस्ट रोजी असून या दिवशी जिल्ह्यात पोळ्याचा सण साजरा होणार आहे पळ्याला बैलजोड्यांना सजवून पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण केला जाणार आहे. पोळा या सणाला मराठी श्रावण महिन्याचा समारोप होत असतो. तान्हा पोळ्याला मातीसह लाकडी बैलांची पूजा केली जाणार आहे.

**श्रीकृष्ण जन्माष्टमी, कावड यात्रेचीही राहणार धूम**

श्रावण महिन्यात श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त शहरासह जिल्ह्यात विविध ठिकाणी दहीहंडीचे आयोजन केले जाते. यात विविध पक्षांचे पदाधिकारी यांच्याकडून दहीहंडीचे आयोजन होत असते. दहीहंडीनिमित्त शहरात उत्साहाला उधाण येते. तसेच दर श्रावण सोमवारी कावड यात्रेचेही मोठे वाजत-गाजत शिवालयांमध्ये आगमन होत असते. कावड यात्रेतील देखावे बघण्यासाठी भाविकांची शिवालयांसह रस्त्यांवरही चांगलीच गर्दी होत असते.

**श्रावण सोमवारी मंदिरात राहणार गर्दी**

श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी महादेवाच्या मंदिरात भगवान शंकराची विशेष पूजा-अर्चा केली जाते. तसेच जिल्ह्यातील अनेक महादेव मंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी होणार आहे. शिवलिंगाचा आकर्षक श्रृंगार, बिल्वपत्र अभिषेक, महाआरती, व्रतपूजा, भजन आदी कार्यक्रम पार पडणार आहेत. शिवालय परिसरात यात्रा व धार्मिक उत्सवाचे वातावरण असणार आहे.